शनिवार, 16 जुलै 2022

⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 310

Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 16 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-310 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


## सहस्रकुंडचे रौद्ररूप ...



सततच्या सुरू असलेल्या पावसामुळे माहूर जवळच्या धानोड येथे पैनगंगा नदीला पूर आला आहे. जिल्ह्यात गेल्या दहा दिवसांपासून चालू असलेल्या मुसळधार पावसामुळे पैनगंगा नदी धोक्याच्या पातळी गाठली आहे. पाण्याचा ओघ वाढून तीस ते चाळीस फुटावरून सहस्रकुंड धबधबा फेसाळत वाहतो. दरम्यान पाण्याच्या या वाढत्या प्रवाहांमुळे सहस्त्रकुंड धबधब्याचे रौद्ररूप, अक्राळ विक्राळ दिसत आहे. पावसाची संततधार सुरूच असून पैनगंगा नदीची पूर परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. किनवट तालुक्यात सर्वत्र अतिवृष्टीची झाली असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. अशा पूर परिस्थितीत व पावसाच्या वाढत्या जोराने सहस्रकुंड धबधब्याने रौद्ररूप धारण केले आहे. त्यामुळे ही पूर परिस्थिती व धबधबा क्षेत्रात पाण्याचा वाढता विसर्ग लक्षात घेऊन सहस्रकुंड धबधबा पर्यटकांसाठी दोन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला.

# मुख्यमंत्र्यांचे ओपन चॅलेंज

## ५० मधला एकही आमदार पडला तर राजकारण सोडेन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : सगळे विरोधक एकमुखाने सांगतायत की ५० मधला एकही आमदार निवडून येणार नाही. त्यांना मी सांगू इच्छितो, याअगोदरचे बंड वेगळे होते. त्या-त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. आताचे बंड नसून उठाव होता. ५० मधला एकही आमदार पडला तर मी राजकारण सोडेन, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. शिवसेना आमदार आणि माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिरात आयोजित केला होता.**



या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना एकनाथ शिंदे यांनी जोरदार फटकेबाजी केली. एक दोन आमदार आले असते तर ठीक पण पन्नास आमदार काही मागणी नसताना येतात, माझ्यावर विश्वास दाखवतात ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

...तर राजकारण सोडेन

विरोधकांनी कितीही वेळा सांगू द्या, बंडखोर आमदार निवडून येणार नाही. पण मी ठणकावून सांगतो, एकही आमदार पडणार नाही आणि ५० मधला एकही आमदार पडला तर मी राजकारणातून निवृत्ती घेईन, असे एकनाथ शिंदे म्हणाले. ज्यावेळी बंड केले, त्यावेळी मी राजकीय आत्महत्या केली, असे अनेक जण सांगत होते. पण मी नेमके काय करतोय, याची मला पूर्णपणे जाणीव होती. बंडावेळी मी ३ दिवस आणि ३ रात्र झोपलो नव्हतो. माझ्या राजकीय करिअरची मला अजिबात भीती नव्हती, कारण मी ५० आमदारांच्या भवितव्याची चिंता केली होती, असेही शिंदे म्हणाले.

### संभाजीनगर बाळासाहेबांच्या मुखातून निघाले, नामांतराला स्थगिती नाही

औरंगाबादचे संभाजीनगर नामांतर करण्याबाबत ठाकरे सरकारने घेतलेल्या निर्णयाला शिंदे सरकारने स्थगिती दिल्यावरुन चर्चांना उधाण आले होते. मात्र आपण नामकरणाला स्थगिती दिलेली नाही, संभाजीनगर हे नाव शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मुखातून निघाले, त्यामुळे उद्या सकाळीच कॅबिनेट बैठक घेऊन संभाजीनगर नावावर शिक्कामोर्तब करणार, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

# लवकरच न्यूज वेबसाईट कायद्याच्या चौकटीत येणार

## डिजिटल मीडियासाठी नव्या कायदा प्रक्रियेला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** या नव्या विधेयकात डिजिटल न्यूज मीडियाचा देखील समावेश करण्यात येणार आहे. देशात डिजीटल न्यूज मीडियासाठी हा पहिलाच कायदा असेल. हा कायदा पारित झाल्यास सर्व न्यूज वेबसाईट या कायद्याच्या चौकटीत येणार आहे. हा कायदा पारित झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत वेबसाईटची नोंदणी करावी लागणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

भारतात पहिल्यांदाच डिजिटल मीडियाच्या नोंदणीसाठी एक नवीन कायदा आणण्यात येणार आहे. याबाबत माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून प्रेस आणि नियतकालिकांच्या नोंदणी विधेयकात सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

वेबसाईट प्रकाशकांना आपल्या वेबसाईटची नोंदणी प्रेस रजिस्टार जनरल यांच्याकडे करावी लागेल. तसेच कोणत्याही वेबसाईटवर कारवाई करण्याचे अधिकारही त्यांच्याकडेच असतील. त्यानुसार ते कोणत्याही वेबसाईटची मान्यता रद्द करू शकतात किंवा त्यांना दंड ठोठावू शकतात. त्यासोबतच तक्रार निवारणासाठी मंडळदेखील स्थापण करण्यात येणार आहे. त्याचे प्रमुख हे प्रेस कॉन्सिल ऑफ इंडियाचे मुख्य अधिकारी असतील.


यापूर्वी डिजीटल न्यूज मीडियावर कोणत्याही प्रकारचे कायदेशीर बंधने नव्हती. मात्र, हे सुधारणा विधेयक पारित झाल्यानंतर सर्व न्यूज वेबसाईट या कायद्याच्या चौकटीत येणार आहे. २०१९ मध्ये सरकारने या कायद्याचा मसूदा तयार केला होता. त्यावरून सरकारवर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. सरकार डिजीटल मीडियावर अंकूश ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप अनेकांकडून करण्यात आला होता.

# न्यायाधीश नऊ वाजता कामाला सुरुवात का करू शकत नाहीत? : न्यायाधीश ललित

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश उदय यू ललित यांनी इतर न्यायाधीशांच्या कामकाजाच्या वेळेवर कडक शब्दात टीका केली आहे. जर मुले ७ वाजता शाळेत जाऊ शकतात, तर न्यायधीश सकाळी ९ वाजता कामाला सुरुवात का करू शकत नाहीत? असा प्रश्न न्यायाधीश ललित यांनी विचारला आहे. साधारण सकाळी १०.३० वाजता सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजाला सुरुवात होते आणि दुपारी चार वाजेपर्यंत न्यायलयाचे कामकाज चालते. तसेच दुपारी एक ते दोन अशी एक तासांची जेवणाची सुट्टीही न्यायधीश घेतात. मात्र, न्यायधीश उदय यू ललित यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने नियमित कामकाजाच्या वेळेच्या एक तास अगोदरच म्हणजे सकाळी ९.३० वाजता न्यायालयात दाखल होत सुनावणीस सुरुवात केली. त्यांच्या खंडपीठात न्यायमूर्ती एस रवींद्र भट आणि न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांचाही समावेश होता. न्यायाधीश ललित यांच्या या निर्णयाचे सगळीकडून कौतुक करण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधीशांनी सकाळी ९ वाजता कामकाजास सुरुवात करा. अडीच तासाने म्हणजे सकाळी ११.३० वाजता विश्रांती घेऊन १२ वाजता पुन्हा कामकाजास सुरुवात करा आणि दुपारी २ वाजेपर्यंत आपली कामे पूर्ण करा. म्हणजे सायंकाळी लांब पल्ल्याच्या सुनावणीसाठी जास्त वेळ मिळेल, असे मत न्यायाधीश उदय यू ललित यांनी केली आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# अवलियांचा गाव : राहाता

अत्यंत कष्टातून पुढे आलेलं हे व्यक्तिमत्व. आज आर्थिक दृष्ट्या संपन्न असले तरी आपण पानविक्रीच्या व्यवसायातून वर आलो आहे याची आठवण ठेऊन आजही ते पानविक्री करतात. त्यांच्याशी बोलताना हे व्यक्तिमत्व वेगळं आहे हे जाणवलं. विचारांची खोली जाणवली. चेहऱ्यावर एक प्रसन्न शांतता. कुठेही आरडाओरड नाही. बडेजाव नाही. त्यांच्याच एका हॉटेलमध्ये आम्ही दाक्षिणात्य पद्धतीचा नाश्ता केला. त्यांच्याशी गप्पा मारणं ही एक पर्वणी आहे. बोलता बोलता उपवासाचा विषय निघाला. ते म्हणाले, ' सर, आपण उपवास का करतो ? जर पुण्य मिळवण्यासाठी असेल तर एखाद्या भुकेल्या व्यक्तीला पोटभर जेवण द्या म्हणजे तुमचा उपवास सफल झाला. उपवास आरोग्यासाठी असेल तर साबुदाण्याच्या खिचडीसारखे जड पदार्थ खाऊन उपवास करू नका. बोलताना नेहमी चांगलेच बोला. कारण तुम्ही जे बोलाल, त्याला तुमची वास्तू तथास्तु म्हणत असते. ' अशा प्रकारे विविध विषयांवर आमची चर्चा सुरु होती पण वेळेअभावी आवरते घ्यावे लागले. थोरातांची एक दोन पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत. तसेच ते विविध ठिकाणी व्याख्यानासाठी सुद्धा जातात असे बोलण्याच्या ओघात कळले. माझ्या लक्षात आलं की एखाद्या व्यक्तीकडे नुसते वरवर पाहून चालत नाही. तिचे गुण, स्वभाव कळण्यासाठी तिच्या सहवासात यावे लागते. बऱ्याच वेळा आपण एखाद्या व्यक्तीच्या बाह्य रंगरूपाकडे पाहून तिचा अंदाज बांधत असतो. भाऊ थोरातांसारखी माणसं पाहिली की अशा गोष्टी प्रकर्षाने जाणवतात.

जाता जाता आणखी एका व्यक्तीची ओझरती भेट झाली. ती व्यक्ती म्हणजे श्याममामा दंडवते. ते बँकेत काम करतात. पुण्यामध्ये अंध व्यक्तींसाठी काम करणाऱ्या आणि स्वतः अंध असलेल्या राहुल देशमुख आणि देवता यांचे ते मामा. अंध परंतु हुशार आणि कर्तबगार अशा राहुल देशमुख यांच्याशी विवाह करणाऱ्या डोळस देवता यांच्या विवाहाला त्यांनी भक्कम पाठिंबा दिला. एक अनोखा संबंध घडून आला. राहुल आणि देवता यांच्या सहकार्याने पुण्यात अंधांसाठीची संस्था उभी राहिली. याचे श्रेय या दंडवते मामांना नक्कीच जाते. साईबाबांच्या नगरीत माणसांच्या रूपातअशी साईंची विविध रूपे पाहायला मिळाली आणि धन्य झालो. या सगळ्या माणसांना कसं जगायचं, का जगायचं हे तर कळलं आहेच पण माझ्या मते इतरांचं जगणं सुंदर करणारी ही माणसं आहेत. कविवर्य बा भ बोरकरांच्या शब्दात सांगायचे तर ' जीवन त्यांना कळले हो...' असेच म्हणावे लागेल. निघताना रवींद्र आणि त्यांच्या सौभाग्यवतींचा प्रेमळ निरोप घेऊन आणि अनेक सुखद आठवणींची शिदोरी घेऊन आम्ही पुण्याकडे मार्गस्थ झालो.



## आनंदी पहाट

# आव्हानांचे हसतमुखाने स्वागत करावे

आधुनिक केसरी

आपण सामान्यतः जीवनातील आव्हानांपासून दूर जाऊ शकत नाही आणि आंतरिक शांती नेहमीच आपल्या अडचणी दूर करणार नाहीत. परंतु तरीही मनःशांती खूप महत्त्वाची आहे, कारण ती आपल्याला चिंता आणि दडपशाहीच्या भावना कमी करून त्रासाच्या वेळी शांत राहण्यास मदत करू शकते. आपण आपल्या मनावर नियंत्रण ठेवू शकत नाही आणि फक्त सांगू शकत नाही, "अधिक शांत व्हा", जसे आपण आपल्या जीवनातील विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यावर नियंत्रण ठेवू शकत नाही. वेळोवेळी विविध आव्हाने समोर येतील, ज्यामुळे आपली दैनंदिन दिनचर्या गुंतागुंतीची होईल आणि आपल्याला चिंता, नकारात्मक विचारांचा निचरा न होणे किंवा अगदी भीती वाटणे असेही अनुभव येत राहतील. परंतू अशाही परिस्थितीत प्रत्येक आव्हानांना हसतमुखाने स्वागत करणे, तोंड देणे जरुरीचे असते. आपण त्या भावनांवर नियंत्रण ठेवतो, तेव्हा ते अखेरीस आपल्यावर ताबा मिळवू शकतात, आपली शांतता भंग करू शकतात आणि सामना करणे अधिक कठीण बनू शकते. अशावेळेला मनाला आराम देणारा हळू, खोल श्वास घ्यावा किंवा विश्रांतीसाठी इतर श्वासोच्छवासाचे व्यायाम करून पाहावेत, सुखदायक संगीत ऐकावे, सजग ध्यानाचा सराव करावा, सजग ध्यानाचे उद्दिष्ट सध्याच्या क्षणी घडत असलेल्या गोष्टींवर आपले लक्ष केंद्रित करणे हेच आहे हे लक्षात घावे, मनातील विचार लिहावेत, काहीतरी नवीन वाचावे, मार्गदर्शित प्रतिमा डोळ्यांसमोर आणावी, निसर्गात वेळ घालवावा, स्वतःशी प्रामाणिक राहावे, आपण अशावेळी सकस आहाराचेच सेवन करावे, नियमितपणे केला जाणारा व्यायाम करावा, सत्कर्म करावे, आपल्या विचारांशी ठाम राहावे, जमेल तितक्या वेळ ध्यान करावे अशा अनेक कृती करण्याने मनःशांती मिळविणे त्वरित शक्य होऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## विठुच्या भाक्तीत । द्वैत डोले ।।

घेऊ भक्ती भावे । नाम विठोबाचे ।।
हरिपाठ वाचे । नित्य गाऊ ।।१।।

पूर्व संचिताने । पुण्य साठवले ।।
त्यास आठवले । हरिनाम ।।२।।

ऐकोनिया वाणी । संतसज्जनांची ।।
गोडी अभंगाची । जीवा लागे ।।३।।

वैष्णवांची दिंडी । पंढरीच्या वाटे ।।
नामघोष उठे । अंतरात ।।४।।

टाळ-मृदुंगाचे । साधता अद्वैत ।।
विठुच्या भक्तीत । मन डोले ।।५।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**कान्ताकटाक्षविशिखा न लुनन्ति यस्य**
**चित्तं न निर्दहति कोपकृशानुतापः ।**
**कर्ष न्ति भूरिविषयाश्च न लोभपाषै -**
**र्लोकत्रयं जयति कृत्स्नमिदं स धीरः ।।**

**अर्थ :** ज्याच्या चित्ताचा वेध सुंदरींचे कटाक्षही घेऊ शकत नाहीत, ज्याला क्रोधाग्नी जाळू शकत नाहीत, ज्याला विषय आपल्या लोभपाशांनी आकर्षित करू शकत नाहीत, ती धीरोदात्त व्यक्ती समस्त त्रिलोकावर विजय प्राप्त करते. धीरोदात्त व्यक्तिमत्व कशाप्रकारे सर्वजयी ठरते, ते येथे भर्तृहरींनी या श्लोकाद्वारे सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## सद्गुरू सांगेल त्याप्रमाणे वागावे



आधुनिक केसरी

शुद्ध भावना म्हणजे मोबदला न घेण्याची किंवा फलाशा सोडण्याची इच्छा. भक्ति ही अशी निरपेक्ष असावी. देवालये बांधली, देवांचे पूजन-अर्चन केले, म्हणजे भक्ति निरपेक्ष केली असे नव्हे. देवाचे करीत असताना, जप करीत असताना, त्यापासून काही हवे आहे असे न वाटले पाहिजे. तुम्ही सर्व लोक भजन पूजन करता, परंतु हे सर्व कसे होऊन बसले आहे ? जसे भांडे कुठे ठेवावे, पळीताम्हन कुठे ठेवावे, वगैरे जे शास्त्रात लिहिलेले असते ते सर्व, माणूस तोंडाने म्हणत असतो आणि करीत असतो. कारण त्यामुळे त्याला कृती करणे सोपे जाते. तसे आपण देवाचे करतो. परंतु ते केवळ केले पाहिजे म्हणून, ती आपल्या घरातली एक प्रथा आहे म्हणून; आपल्याला देव आवडतो म्हणून नव्हे. एक मुलगा होता, त्याला त्याच्या वडिलांची पत्रे येत असत. तो पत्र वाची आणि देव्हाऱ्यात ठेवून देई. दुसरे पत्र आले की ते वाची, आणि मागले पत्र काढून टाकी. एकदा वडिलांनी पंचवीस रुपये मागितले. मुलाने ते पत्र वाचले आणि नेहमीप्रमाणे पूजेत नेऊन ठेवले. नंतर काही दिवसांनी वडिलांकडून एक गृहस्थ आला आणि म्हणाला, "तुला तुझा वडिलांचे पत्र मिळाले का ?" त्यावर तो म्हणाला "हो." त्यावर त्या गृहस्थाने विचारले, "अरे, मग पैसे का पाठविले नाहीस वडिलांना ?" त्यावर तो म्हणाला, "तेवढेच राहिले बघा !" तसे आपले होते. आपण कृती करतो, पूज्यभाव वगैरे ठेवतो, परंतु सद्गुरूने सांगितलेले तेवढे करीत नाही. त्यामुळेच आपली सत्कर्मे ही आपला अहंकार कमी व्हायला कारणीभूत न होता, उलट अहंपणा वाढवायलाच मदत करतात. म्हणून सद्गुरूने सांगितलेले साधनच आपण प्रामाणिकपणे, संशयरहित होऊन करावे. त्याकरिता व्यवहार सोडण्याची जरूर नाही.

आपण व्यवहाराला सोडू नये, पण व्यवहारात गुंतू नये. युद्धात सारथ्याच्या हाती सर्व काही असते. तो लगाम हाती घेऊन जागृतपणे उभा असतो, आणि योग्य वाटेल तेथे रथ नेऊन उभा करतो. युद्धकर्त्याचे काम फक्त बाण अचूक दिशेला किंवा व्यक्तीवर सोडणे. त्याप्रमाणे, आपले सर्व जीवन एकदा सद्गुरूच्या ताब्यात दिल्यावर, तो सांगेल त्याप्रमाणे वागणे हेच आपले कर्तव्य ठरते. ज्याने जगाची आस टाकली त्याचे तेज पडणारच हे लक्षात ठेवावे. एखादा रुपया आपण उचलला तर त्याच्या दोन्ही बाजू जशा एकदमच येतात, त्याप्रमाणे आपण प्रपंचात पडलो की आपल्याला परमार्थ हा पाहिजेच. परमार्थात भगवंताची गरज असते. ही भगवंताची गरज, सद्गुरू त्याचे 'नाम' देऊन भागवितात. आपण हे नाम निरंतर आणि श्रद्धेने घेणे आवश्यक आहे. अशा रीतीने नामात अखंड राहिले तर परमार्थ साधतो, भगवंताची गरज भासते, प्रपंचात समाधान मिळते, आणि जन्माला आल्याचे सार्थक होते.

**आजचे बोधवचन :** गुरूवर विश्वास ठेवून चिकाटीने व आवडीने नाम घ्यावे.

**-श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**

आधुनिक केसरी

# विठ्ठल भक्त संत कुर्मदास

**(मागील अंकावरून पुढे)**

कुर्मदासाला बोलणं सुध्दा असहाय्य झालं होतं... तो पालथा होता तो उताणा झाला... त्याचं सगळं पोट सोलून निघालं होतं. त्याच्या शरीरावर प्रचंड जखमा झाल्या होत्या. त्या जखमात असंख्य खडे रूतलेले होते. अंगातून रक्त वहात होतं. कुर्मदास थकून गेला होता. त्याला बोलण्याचंदेखील त्राण राहीलं नव्हत. निघाल्यापासून त्याच्या पोटात अन्नाचा कणही नव्हता. सगळ्या दिंडीसाठी त्यानं अन्न गोळा केलं... परंतु स्वतःच्या पोटात मात्र? अन्नाचा कण ही नव्हता.... महाराजांनी याचं कारण विचारल्यावर तो सहज म्हणाला... महाराज, मल-मूत्र कोण धुईल माझं? घरी आई धूत होती. इथं कोण धुईल.... म्हणून अन्न पाणी सोडलं... कुर्मदासाचं हे बोलणं ऐकून भानुदास महाराजांचे डोळे डबडबले.... कुर्मदासा!! काय केलं हे?

महाराज, घरी राहून काय केलं असतं.... निदान पंढरीच्या वाटेवर आलो तरी... महाराज, आता फक्त एकच करा...




पंढरपूरला गेल्यावर पांडुरंगाला दोनदा नमस्कार करा... आणि त्याला सांगा.. हे पांडुरंगा!! तुझ्या पायाजवळ यायला कुर्मदासाचं पुण्य थोडं कमी पडलं. या जन्मात नाही पहाता आलं चरण....

पांडुरंगाला माझा एवढा निरोप द्या... असं म्हणुन तो तिथंच विव्हळत पडला....

भानुदास महाराजांचे पाय आता जड झाले... तसेच जड पावलांनी कुर्मदासाला सोडून ते पंढरपुरात आले. चंद्रभागेचं स्नान झालं व विठुरायाच्या दर्शनाला उभे राहीले.

भानुदासांनी पांडुरंगाकडं पाहिलं. पांडुरंगाने भानुदासाकडं पाहिलं. अंतःकरणातलं चिंतन तिथपर्यंत पोहोचलं.

पाडुरंग रुक्मिणी मातेला म्हणाले, रखुमाई!! तु वारी सांभाळ... मी माझ्या भक्ताला कुर्मदासाला लऊळला भेटायला चाललो... पांडुरंगाने गरुडाला आज्ञा केली. विठ्ठल कुर्मदासाजवळ आले. कुर्मदास निपचित शुध्द हरपून त्या वाळवंटात पडला होता. जखमांनी अंगाची लाही लाही झाली होती. शरीरातून रक्त वहातंच होतं. विठ्ठलानं हाक दिली... कुर्मदासा!! अरे डोळे उघड.... बघ मी आलोय तुझ्यासाठी....

मोठ्या हिमतीने कुर्मदासानं अर्धवट डोळे उघडले.... पहातो तर प्रत्यक्षात विठुराया समोर उभे होते... विठ्ठला... विठ्ठला माझ्या पांडुरंगा म्हणत कुर्मदास पुन्हा विठ्ठलाच्या दिशेनं फरफटत लोटांगण घेऊ लागला... एवढ्यात पांडुरंगाने कुर्मदासाकडे धाव घेतली... त्याच शिरकमल आपल्या मांडीवर घेतलं व म्हणाले, कुर्मदासा, तु जिंकलास. तुझं ध्येय पुर्ण झालं. बघ मी स्वतः तुझा विठ्ठल, तुझा पांडुरंग तुझ्या भेटीला आला आहे.

होय विठ्ठला.... आता हीच माझी पंढरी!!!

कुर्मदासाने डोळे भरून पांडुरंगाला पाहीलं व डोळ्यातील आश्रुंनी विठ्ठलाला नमन केलं व आपला प्राण सोडला...

धन्य धन्य तो कुर्मुदास आणि धन्य त्याची भक्ती!!!

मित्रांनो, विशेष म्हणजे हा जो कुर्मदास होता... तो जातीने मुस्लीम होता... आजही लऊळ येथे त्याची कबर आहे आणि त्या कबरीसमोर विठ्ठलाची गोजिरवाणी मूर्ती उभी आहे आणि मंदिरावर कळस आणि कबरीवर गुम्बद आहे. फिरोज मुजावर हे त्या ट्रस्टचे अध्यक्ष असून त्यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



**श्री भद्रा मारोती औरंगाबाद**

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# औरंगाबादेत जो उमेदवार देणार तो निवडून आला नाही तर तोंड दाखवणार नाही : भुमरे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेनेच्या शिंदे गटाच्या आमदारांकडून आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दादर येथील रविंद्र नाट्य मंदिर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाषण करताना आमदार संदीपान भुमरे भावूक झाले. आपला एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास होता. गेल्या काही दिवसांमध्ये राज्यातील सत्तेत उलथापालथ झाली. या दरम्यान एकनाथ शिंदे यांनी ज्यांना मोठे केले ते त्यांच्याबद्दल वाईट बोलत होते. त्यांना माफी द्यायची नाही. त्यांना सोडू नका, असे संदीपान भुमरे आपल्या भाषणात म्हणाले.



एक खंत आहे. तुम्ही ज्यांना मोठे केले गेल्या काही दिवसात ज्यांना तुम्ही भरभरून मदत केली ते देखील तुमच्या बद्दल बोलत होते. त्यांना सोडू नका. तुम्ही मनाने त्यांना माफ कराल. पण आम्ही त्यांना सोडणार नाही. संभाजीनगरमध्ये जो उमेदवार तुम्ही देणार तो निवडून आणणार नाहीतर तोंड दाखवणार नाही, असे संदीपान भुमरे एकनाथ शिंदेंना उद्देशून म्हणाले. एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाताना पदाचा विचार केला नाही. फोन केला, त्यावेळी मी बंगल्यावर होतो. सर्व आमदार माझ्या बंगल्यावर आले. त्यावेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे माझ्या घरी आले. त्यावेळी माझ्या मनात कपट होते. सत्तार माझ्या घरी आले. खैरेंना वाटले माझे आणि सत्तारांचे मिटले. राजपूत त्यावेळी मंत्रालयात कामाला गेले म्हणून हुकले, असे संदीपान भुमरे म्हणाले.

ठाण्याला पुढे चला शिंदे म्हटले होते. रस्त्याने जाताना विचार केला नाही. दुसऱ्या दिवशी मला बड्या नेत्याचा फोन आला. तुमचे पद आणि आमदारकी जाईल असे सांगितले. पण आम्ही सांगितले की शिंदे साहेब मुख्यमंत्री होत नाहीत तोपर्यंत माघार नाही, असे संदीपान भुमरे यांनी सांगितले. वर्षावर एक दोन वेळा बैठक लावली. पण काही सांगायला गेलो की दुसरी माणसे आत असायची. मंत्र्यांची ही अवस्था तर आमदारांचे काय? पैशाने आमदार फुटत नाहीत, असे संदीपान भुमरे यावेळी म्हणाले.

# मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेचा पुरस्कार देवेंद्र काजळे यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** कारसूळ तालुका निफाड येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य देवेंद्र काजळे यांना मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील राष्ट्रीय बाण्याच्या उपक्रमशील संस्थेचा राज्यस्तरीय कुशल नेतृत्व जननायक लोकगौरव पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेचे राज्यस्तरीय गुणीजन गौरव महासंमेलन २०२२ नाशिक येथे संपन्न झाले यावेळी या कार्यक्रमासाठी समारंभाच्या अध्यक्षा इंटरनॅशनल टॅलेंट आयकॉन, आंध्र प्रदेशच्या डॉ.जे सानीपिना, समारंभाच्या पाहुण्या डायरेक्टर, फिजीकल एज्युकेशन स्पोर्ट्स, डॉ. मिनाक्षी गवळी, विशेष पाहुण्या योग पंडित मिसेस ग्लोबल युनिव्हर्सल क्विन २०२० डॉ. पुनम



बिरारी, महापरिषद समन्वयक मनिषा कदम आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष एल.एस.दाते उप स्वागताध्याक्ष चंद्रहास गावंड प्रसिद्धी प्रमुख अमोल सुपेकर व मानद सल्लागार व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत सेलुकर यांनी केले. मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेकडून राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, कला, आरोग्य, पोलीस, कृषी व राजकीय अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना तसेच जनतेच्या सेवेसाठी सदैव उपस्थित राहणारे देवेंद्र काजळे यांना राज्यस्तरीय कुशल नेतृत्व जननायक गुणीजन लोकगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याने कारसूळ येथील सिताराम जाधव, भाऊसाहेब शंखपाळ, मधुकर ताकाटे, श्रीनिवास गवळी, नितिन गवळी, मनोज गवळी, भास्कर जाधव, राजाराम जाधव, करसूळच्या सरपंच स्वाती काजळे,उपसरपंच उज्ज्वला गांगुर्डे, सदस्य शामराव शंखपाळ, आशा ताकाटे, मनिषा काजळे, पुनम पगार, अमोल ताकाटे, भाऊसाहेब कंक, उध्दव काजळे, कैलास पगार, संपत कडाळे, प्रमोद शंखपाळ, बाळु शंखपाळ, गोविंद काजळे, बापु वाघचौरे, माणिक वाघचौरे, रमेश जाधव, योगेश गांगुर्डे, आदी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# सोमवारपासून डाळिंब लिलावास सुरूवात : सुवर्णा जगताप

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आशिया खंडात नंबर एकची कांदा बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व ७४ देशांमध्ये कांद्याची निर्यात होणाऱ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारावर सोमवार, दि. 18 जुलै, 2022 पासुन डाळींब लिलावास सुरूवात होणार असल्याची माहिती बाजार समितीच्या सभापती सौ. सुवर्णा जगताप यांनी दिली.

लासलगावसह परीसरातील निफाड, चांदवड, येवला, सटाणा, देवळा, कळवण, मालेगाव, सिन्नर, कोपरगाव, राहुरी, राहाता व नेवासा तालुक्यातील गावांमध्ये शेतकऱ्यांनी डाळींब या शेतीमालाची मोठ्या प्रमाणावर लागवड केलेली असल्याने त्यांना माल विक्रीची सोय व्हावी म्हणुन बाजार समितीतर्फे गेल्या ७ ते ८



वर्षापासून डाळींब लिलावास सुरूवात करण्यात आली आहे. त्यानुसार यावर्षी सोमवार, दि. १८ जुलै २०२२ पासुन प. पू. भगरीबाबा धान्य व भाजीपाला मुख्य बाजार आवार, लासलगांव येथे डाळींब लिलाव सुरू होणार आहे. त्यामुळे डाळींब उत्पादकांनी आपला डाळींब हा शेतीमाल योग्य प्रतवारी करून 20 किलोच्या क्रेटस् मध्ये विक्रीस आणल्यास त्यास जास्तीत जास्त बाजारभाव मिळणार आहे.

किडका, पिचका, लहान (अपरीपक्व), खर्डा असलेला डाळींब वेगळ्या क्रेटस् मध्ये विक्रीस आणावा. लिलावानंतर लगेच इलेक्ट्रॉनिक काट्यावर चोख वजनमाप व रोख चुकवती देण्यात येईल. तसेच डाळींब खरेदीस इच्छुक असणाऱ्या व्यापाऱ्यांनी लायसेन्स बाबतच्या सर्व अटी पुर्ण केल्यास त्यांना तात्काळ परवाना देऊन पॅकींग व साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सुवर्णा जगताप यांनी सांगितले. तरी शेतकरी बांधवांनी त्यांचा डाळींब हा शेतीमाल सोमवार, दि.18 जुलै 2022 पासून प.पू. भगरीबाबा धान्य व भाजीपाला मुख्य बाजार आवार, लासलगांव येथे विक्रीस आणावा असे आवाहन बाजार समितीच्या सभापती सुवर्णा जगताप, उपसभापती प्रिती बोरगुडे, सचिव नरेंद्र वाढवणे यांनी केले आहे.

# संभाजीनगर नामांतराचा ठराव रद्द करणाऱ्या सरकारच्या विरोधात उद्या गंगापुरात शिवसेनेच्या वतीने निदर्शने : दिनेश मुथा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** महविकास आघाडी सरकारच्या वतीने घेण्यात आलेल्या संभाजीनगर/धाराशिव नामांतरचा ठराव रद्द करणाऱ्या शिंदे - फडणवीस सरकारचा जाहीर निषेध गंगापूर तालुका शिवसेनेच्या वतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे शिवसैनिक व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुक दिनेश मूथा यानी केले आहे.

माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यानी औरंगाबादचे संभाजीनगर व उस्मानाबाद जिल्ह्याचे धाराशिव असे नामांतर ठराव मंत्रिमंडळ बैठकीत पास केला होता मात्र शिंदे फडणवीस सरकारने हा ठराव रद्द केला असल्याने नामंतराचा ठराव रद्द करणाऱ्या सरकारच्या विरोधात उद्या दिनांक १६.०७.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता शिवसेना गंगापूर तालुक्याच्या



वतीने गंगापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकाळी 10 वाजता जाहीर निदर्शने करण्यात येणार आहे हे निदर्शने शिवसेना उपजिल्हाप्रमुख लक्ष्मण भाऊ सांगळे, कृष्णा पाटील डोणगावकर, अविनाश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तरी तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, शिवसैनिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख दिनेश मुथा यांनी केले आहे.



# मोलखेडा, हिवरी येथे 'थोडेसे मायबापासाठी पण' अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील ग्रामपंचायत मोलखेडा/हिवरी येथे दि.१५ शुक्रवार रोजी "थोडेसे मायबापासाठी पण" हे अभियान ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच मनिषा वारंगणे, उपसरपंच गुलाबराव राणा व ग्रामविकास अधिकारी सुरेखा मॅंडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. 'थोडेसे मायबापासाठी पण सुंदर माझे कार्यालय सुंदर माझे गाव या अभियानांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले.

थोडेसे मायबापासाठी पण या अभियानांतर्गत ज्येष्ठ नागरिकांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा सत्कार करून पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. 'ज्येष्ठ नागरिक कक्ष सुरू करण्यात आला. मान्यवरांनी या कक्षाचे उद्‌घाटन केले. सुंदर माझे गाव, सुंदर माझे कार्यालय अभियानअंतर्गत ग्रामपंचायत मोलखेडा/हिवरी कार्यालयाची व इतर ठिकाणांची स्वच्छता, अभिलेखे वर्गीकरण करण्यात आले. यावेळी राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानअंतर्गत स्वयं सहाय्यता गटातील महिलांना शासनाच्या विविध अभियान व योजनांबाबत ग्रामविकास अधिकारी सुरेखा पवार मॅंडम यांनी मार्गदर्शन याप्रसंगी करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी गटणे, व गटविकास अधिकारी सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे. यावेळी गावातील जेष्ठ नागरिक रामभाऊ वारंगणे, सरपंच मनिषा वारंगणे, उपसरपंच गुलाबराव राणा व ग्रामविकास अधिकारी सुरेखा पवार मॅंडम, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सर्व सदस्य, कर्मचारी, वयोवृद्ध महिला आदी उपस्थित होते.



# युरो व डॉलरची बरोबरी

आधुनिक केसरी

सुमारे दोन दशकांनंतर युरोपीय संघाचे चलन असलेले युरो आणि अमेरिकी डॉलर यांनी मूल्य-बरोबरी साधली. जगाच्या अर्थकारणाचे दोर हाती राखणाऱ्या मोठ्या हिश्शाची चलने समान पातळीवर असणे ही खरे तर एरव्ही स्वागतपर बाब ठरली असती. पण प्रत्यक्षात युरोमध्ये झालेली अमेरिकेच्या डॉलरशी बरोबरी साधणारी ही घसरण आहे. युरोचे हे दुबळेपण सबंध युरोपच्या अर्थव्यवस्थेच्या अंगाने नकारात्मक परिणाम करणारे आहेच, जगाच्या अर्थकारणासाठीही ते अहितकारक आहे काय? अमेरिकेतील विक्रमी चलनवाढ आणि तिला रोखण्यासाठी व्याजदरात आक्रमकपणे वाढ हा घटनाक्रम मार्चपासून म्हणजे रशिया-युक्रेन युद्धाच्या भडक्यापासूनच सुरू आहे. याच्या परिणामांवर वेगवेगळे तर्क-वितर्क हे विश्लेषक जगतात सुरू आहेत. काहींच्या मते, या गोष्टी अर्थव्यवस्थेत मागणीला मारक ठरतील, म्हणजेच पर्यायाने आर्थिक मंदीचे कारण ठरतील. तथापि सध्या तरी अमेरिकेतील व्याजदर वाढ ही रोखे व अन्य गुंतवणुकीवरील परताव्यात वाढ करणारी ठरली आहे. त्या परिणामी ती जगभरातून गुंतवणुकीला आकर्षित करत आहे. अमेरिकेत चांगला परतावा मिळत असताना, अन्यत्र पैसा का गुंतवून ठेवावा, असे हे गुंतवणूक- मानस आहे. त्यामुळे भारतासह उभरत्या अर्थव्यवस्थेत गुंतलेला पैसा वेगाने माघारी चालला आहे. अमेरिकेतील हा वाढता गुंतवणूक ओघ, स्वाभाविकच त्या देशाचे चलन, डॉलरला बळकटी देणारे आहे. या बलशाली डॉलरच्या झळा युरोसह, भारताच्या रुपयालाही सोसाव्या लागत आहेत. रुपयाचे मूल्य प्रति डॉलर ८०च्या वेशीवर जाऊन पोहोचले आहे, जे वर्षारंभी म्हणजे १२ जानेवारीला ७३.७७ पातळीवर होते. युरोचे मूल्य तर त्याहून अधिक म्हणजे २०२२ सालच्या सहा महिन्यांत डॉलरमागे तब्बल १२ टक्क्यांनी गडगडले आहे. गुरुवारच्या व्यवहारात भारतीय चलनात युरोचे मूल्य ७९.७६ रुपये तर डॉलरचे मूल्य हे ७९.५५ रुपये असे जवळपास एकसमान होते. युरोपीय संघातील १९ देश आणि त्या देशांच्या सुमारे ३४ कोटी लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणारे सामाईक चलन युरोने १९९९ सालात सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात एका युरोचे मूल्य हे ८५ सेंटच्याही खाली होते. पण पहिल्या वर्षांतच म्हणजे डिसेंबर १९९९ मध्ये युरो-डॉलर हे एकास एक पातळीवर आले. पुढे चढ-उतार सुरू राहिल्यानंतर, २००२ मध्ये पुन्हा डॉलरच्या मूल्याशी बरोबरी साधली. त्यापुढे मात्र युरोने डॉलरला मात देत निर्णायक आघाडीही घेतली. इतकी की, २००८ च्या जागतिक आर्थिक संकटात अमेरिकेची अर्थव्यवस्था विलक्षण मंदावल्याने, एका युरोची किंमत अमेरिकी डॉलरच्या १.६ पटीपर्यंत बळावली होती. युक्रेन युद्धामुळे रशियावर पाश्चात्त्य जगताकडून आर्थिक निर्बंध आले. युरोपीय राष्ट्रांनी रशियावर प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पावले टाकली आणि व्यापारी संबंधही तोडले. याची उलट युरोपच्याच अर्थव्यवस्थेला भयंकर प्रतिकूल परिणामांसह मोठी किंमत मोजावी लागत आहे. तेथील अनेक देशांची अर्थव्यवस्था रशियाकडून होणाऱ्या वायुपुरवठ्यावर अवलंबून आहे. या देशांतील वीजनिर्मिती आणि ऊर्जा उद्योगासाठी तो अत्यावश्यक आहे. पर्यायी आयात स्रोत शोधले तरी पारंपरिकपणे तेल आणि वायूची किंमत डॉलरमध्ये दिली जाते. युक्रेन युद्धामुळे अलीकडच्या काही महिन्यांत या दोन वस्तूंच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत. डॉलर हे जागतिक चलन म्हणून मान्यता पावले आहे आणि त्या चलनावर नियंत्रण ज्या देशाचे आहे ती अमेरिका मात्र विक्रमी चलनवाढ आणि मंदावत चाललेला आर्थिक विकास (ज्याला अर्थशास्त्रीय परिभाषेत 'स्टॅगफ्लेशन' म्हणतात) अशा दुहेरी आव्हानांचा सामना करीत आहे, हा एक मोठा विरोधाभासच आहे. तो तसा असणे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी मानवणारे निश्चितच नाही.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# धरणांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

आधुनिक केसरी

**भारतातील धरणांबाबतचा संयुक्त राष्ट्रांचा अहवाल धक्कादायक आहे. या अहवालात असे म्हटले आहे की 2025 पर्यंत भारतात अशी एक हजाराहून अधिक धरणे असतील जी पन्नास वर्षांहून अधिक जुनी आहेत आणि या धरणांमुळे जीवित आणि मालमत्तेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अहवालात असेही म्हटले आहे की 2050 पर्यंत पृथ्वीवरील बहुतेक लोक धरणांच्या आसपास राहत असतील. म्हणजे धरण परिसरात लोकसंख्या अधिक असणार आहे. बहुतेक धरणे विसाव्या शतकातील असून त्यांचे सुरक्षित आयुष्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. अशा परिस्थितीत लोकांच्या जीवाला मोठा धोका होऊ शकतो.**



मान्सूनच्या पावसाने देशातील बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. काही छोट्या धरणांमधून पावसाचे पाणी ओसंडून वाहत आहे, तर मोठ्या धरणांच्या भरण्याच्या क्षेत्रात आलेल्या अतिरिक्त पाण्याचा विसर्ग वेगाने केला जात आहे.
चांगला पाऊस असलेल्या नद्यांच्या प्रवाह क्षेत्रात बांधलेल्या धरणांच्या भरावाच्या क्षेत्रात सरासरीपेक्षा जास्त पाण्याची आवक होत असल्याने धरणांच्या सुरक्षिततेसाठी अतिरिक्त पाण्याचा निचरा करणे आवश्यक होते. कधी कधी हा विसर्ग एवढा असतो की सखल भागातील वस्त्या पुराच्या बळी ठरतात. या दृष्टिकोनातून, धरणे काहीवेळा सामान्य जीवनासाठी धोकादायक असल्याचे दिसून येते. परंतु आधुनिक जीवनाच्या विकासाची रचना अशा प्रकारे केली गेली आहे की धरणे हा विकासाच्या शिडीचा एक आवश्यक घटक बनला आहे. वीजनिर्मितीपासून ते सिंचनापर्यंत सर्वच गोष्टींसाठी पाण्याच्या उपलब्धतेची गरज लक्षात घेऊन जगाला धरणांची गरज अधोरेखित होते.
जेव्हा आपण निसर्गाचा प्रवाह रोखतो आणि त्यावर नवीन रचना तयार करतो तेव्हा निसर्ग सतत मुक्त होण्यासाठी धडपडत असतो. एक सामान्य माणूस आपल्या मनाविरुद्ध कोणतेही बंधन सहजासहजी स्वीकारत नाही, मग नद्यांनी आपल्या नैसर्गिक गतीच्या मार्गात येणारे अडथळे सहजतेने स्वीकारावेत अशी अपेक्षा आपण कशी करू शकतो? असे असले तरी, जगातील प्रत्येक अस्तित्वाला एक निश्चित आयुर्मान असते आणि ठराविक काळानंतर त्याची क्षमता नष्ट होऊ लागते. आजकाल देशातील अनेक मोठ्या धरणांबाबतही तेच घडत आहे. भारतातील धरणांबाबतचा संयुक्त राष्ट्रांचा अहवाल धक्कादायक आहे. या अहवालात असे म्हटले आहे की 2025 पर्यंत भारतात अशी एक हजाराहून अधिक धरणे असतील जी पन्नास वर्षांहून अधिक जुनी आहेत आणि या धरणांमुळे जीवित आणि मालमत्तेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अहवालात असेही म्हटले आहे की 2050 पर्यंत पृथ्वीवरील बहुतेक लोक धरणांच्या आसपास राहत असतील. म्हणजे धरण परिसरात लोकसंख्या अधिक असणार आहे. बहुतेक धरणे विसाव्या शतकातील असून त्यांचे सुरक्षित आयुष्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. अशा परिस्थितीत लोकांच्या जीवाला मोठा धोका होऊ शकतो. असे 'एजिंग वॉटर इन्फ्रास्ट्रक्चर' या संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात म्हटले आहे. 1930 ते 1970 या कालावधीत जगभरात बांधण्यात आलेली अठरा हजार सातशे धरणे असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे. त्यांची रचना पन्नास ते शंभर वर्षांहून अधिक काळ टिकेल अशी आहे. पण पन्नास वर्षात काँक्रीट बंधाऱ्यातील कमकुवतपणा दिसू लागतो हेही निश्चित.
याच अहवालात सुमारे दीडशे वर्षांपूर्वी बांधलेल्या केरळमधील मुल्लापेरियार धरणाचाही उल्लेख आहे. हे धरण कधीही धोका देणारे ठरू शकते आणि तसे झाले तर पन्नास लाखांहून अधिक लोकांना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा या अहवालात देण्यात आला आहे. मुल्लापेरियार धरण हे 53.6 मीटर उंचीचे धरण असून त्याची पाणी धारण क्षमता 4430 चौरस मीटर आहे. हे धरण 1895 मध्ये ब्रिटिश सरकारने सिंचनाच्या उद्देशाने बांधले होते. 1959 मध्ये यातून वीजनिर्मितीही सुरू झाली. बांधणीच्या वेळी धरणाचे आयुष्य पन्नास वर्षे असल्याचे सांगितले जात होते, तर आता त्याला एकशे सत्तावीस वर्षे झाली आहेत.कावेरी नदीवरील कल्लानाई धरण हे भारतातील सर्वात जुने धरण आहे, जे चोल वंशाचे शासक करिकालन यांनी इ.स.पूर्व पहिल्या शतकात बांधले होते. हे धरण 329 मीटर लांब आणि 20 मीटर रुंद आहे. सव्वा दोनशे मीटर उंच असलेले भाक्रा नांगल हे धरण भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील दुसरे सर्वात मोठे धरण आहे, तर टिहरी धरण हे भारतातील सर्वात उंच धरण आहे. उंचीच्या बाबतीत ते जगात आठव्या क्रमांकावर आहे. जुन्या धरणांमुळे जीवित आणि मालमत्तेचा धोका फक्त भारतालाच होणार आहे असे नाही. तर हा धोका जगभर जाणवणार आहे. भारताचा विचार करता, योग्य देखभालीचा अभाव हे धरणांमुळे निर्माण झालेल्या धोक्याचे मूळ कारण असल्याचे मानले जाते. धरणांचे अपयश म्हणता येईल अशा तीन डझनाहून अधिक दुर्घटना भारतात घडल्या आहेत. 31 मार्च 2017 रोजी राजस्थानच्या झुंझुनू जिल्ह्यातील मलसीसर गावात अशी दुर्घटना घडली होती. 588 कोटी रुपये खर्चून अलीकडेच बांधलेले हे धरण तीन महिनेही टिकू शकले नाही. विशेष म्हणजे 2000 ते 2009 या काळात जगात धरणांशी संबंधित दोनशेहून अधिक दुर्घटना घडल्या असून त्यापैकी सर्वाधिक जीवित आणि वित्तहानी अमेरिकेत झाली आहे. अशा प्रकारे, इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात अमेरिकेसह जगातील बहुतेक देशांना धरणांमुळे दुर्घटनांना सामोरे जावे लागले आहे. इतिहासातील सर्वात जुनी ज्ञात धरण दुर्घटना इस. सन 575 मधील येमेन येथील मारिब धरण दुर्घटना होती, ज्यामुळे पन्नास हजारांहून अधिक लोकांना त्यांची घरे सोडावी लागली.
25 ऑगस्ट 1894 रोजी भारतातील गढवाल प्रदेशात गोहना लेक धरण फुटले. त्यानंतर 19 ऑगस्ट 1917 रोजी ग्वाल्हेरचे टिग्रा धरण आणि 7 डिसेंबर 1961 रोजी पुण्याचे पानशेत धरण दुर्घटनेचे बळी ठरले. भारतातील इतर धरण अपघातांमध्ये 1978 मध्ये दामोदर व्हॅली प्रकल्प, 1961 मध्ये बिहारमधील खरगपूर धरण, 1979 मध्ये गुजरातमधील मच्छू धरण आणि 2017 मध्ये बिहारमधील भागलपूर धरण फुटणे यांचा समावेश होतो. 2019 मध्ये रत्नागिरी (महाराष्ट्र) तिवरे आणि 2021 मध्ये वैशाली जिल्ह्यातील महनार विभागातील स्लुइस गेटजवळ बांधलेले धरणाचे फुटणे हे प्रमुख आहेत. गुजरातमधील मच्छू धरण फुटून दोनशे लोकांचा मृत्यू झाला होता. अशाप्रकारे, जगातील धरण दुर्घटनेनंतर, सर्वात जास्त नुकसान चीनच्या हेनान प्रांतात 1975 मध्ये झाले होते. तेव्हा बांकियाओ धरण फुटून सुमारे अडीच लाख लोकांचा मृत्यू झाला होता आणि 10 लाख लोकांना विस्थापित व्हावे लागले होते.
असे असले तरी आपल्या जीवनाच्या योग्य विकासासाठी धरणांचे अस्तित्व आवश्यक आहे आणि जी धरणे मानवी जीवनाच्या गरजा पूर्ण करण्यात मनापासून योगदान देत आहेत, त्यांची योग्य काळजी घेणेही आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन भारताच्या संसदेने राष्ट्रीय धरण सुरक्षा कायदा मंजूर केला आहे जो 30 डिसेंबर 2021 पासून लागू झाला आहे. या कायद्यातील तरतुदींनुसार, सर्व राज्यांनी धरण सुरक्षा प्राधिकरण आणि धरण सुरक्षा समित्या स्वतंत्रपणे स्थापन करायाच्या आहेत. वास्तविक धरण सुरक्षा विधेयक 2018 च्या लोकसभेत मांडण्यात आले, तेव्हा काही प्रादेशिक पक्षांनी याला विरोध केला आणि म्हटले की हे राज्यांच्या अधिकारक्षेत्रावरील अतिक्रमण आहे, परंतु सरकारने असा युक्तिवाद केला की जर दोन किंवा अधिक राज्यांनी कोणत्याही बाबतीत त्यांची संमती दिल्यास ती बाब केंद्राच्या अधिकारक्षेत्रात येते. वास्तविक धरणांच्या सुरक्षेबाबत सरकारने जागरुकता आणि बांधिलकी दाखवली हे महत्त्वाचेच आहे. धरण सुरक्षा विधेयक मंजूर झाल्यानंतर अनेक राज्य सरकारांनी धरण सुरक्षा प्राधिकरण आणि धरण सुरक्षा समित्यांच्या स्थापनेबाबत अपेक्षित उत्साह दाखवला नसला तरी धरणांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारची प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक होती असे मानता येईल. हाच पुढाकार अपेक्षित गती आणि दिशा देण्यात यशस्वी होईल.



रामभाऊ आवारे
संपर्क क्र. 8788504512

# अध्यात्म म्हणजे जीवन समृद्धीचा मार्ग...

आधुनिक केसरी

**अध्यात्म म्हणजे जीवन समृद्धीचा मार्ग आहे. संस्कार आणि संयुक्त समाजरचनेचा पाया असणाऱ्या आध्यत्मिक क्षेत्रात योग्य आणि आध्यत्मिक मार्गदर्शन होण्याऐवजी विनोदाचेच प्रमाण वाढले आहे आणि विनोद इथपर्यंत ठिक आहे पण जर विनोदच अध्यात्माच्या मूळ पायावर होऊ लागला तर आदर्श काय घ्यायचा आपण अनेक वेगवेगळ्या ठिकाणी आध्यत्मिक क्षेत्रात आपण ज्यांचं मार्गदर्शन ऐकतो हे ऐकत असताना आपला उत्साह कायम ठेवणं हे सांगणाऱ्याचे कौशल्य असते परंतु अनेकदा हे सांगताना उत्साहात अध्यात्माच्या क्षेत्रात जे देव-देवता महापुरुष होऊन गेले तेच विनोदाच्या कक्षेत येतात आणि खरी गडबड इथंच होते असं नाही झालं पाहिजे.**

प्रसिद्धीने मोठा झालेला व्यक्ती विचाराने संस्काराने मोठे असेलच असं नाही क्वचित प्रसंगी हा योगायोग जुळून येत असतो. प्रसिध्दी आणि विचाराने जो मोठा असतो तोच खरा महात्मा असतो.आजकाल आपल्याला खरा महात्मा लक्षात येत नाही. खरा महात्मा सत्य कथन करतो आणि सत्य हे कटु असतं नेमकं आपल्याला हेच पचनी पडत नाही. म्हणून आपण खरा महात्मा ओळखण्यात चुकतो आणि आजच्या आध्यत्मिक क्षेत्रातील खरी गडबड इथंच आहे. आपण आध्यत्मिक तत्वज्ञान ऐवजी विनोद आणि प्रसिद्धीला भुलतो. अध्यात्म हे मुळात प्रसिद्धीसाठी नाही आणि प्रसिद्धी मिळणं आणि मिळवणं, त्यासाठी प्रयत्न करणं यामध्ये गैर काहीच नाही.पण यामध्ये कुठेतरी स्वविवेक महत्वाचा आहे. आध्यत्मिक क्षेत्रावर सिनेमा क्षेत्राचा प्रभाव निर्माण होताना दिसत आहे. अनेक अशी वेगवेगळी आध्यत्मिक साहित्य रचना सिनेमातील ताल सुर आणि संगीतावर आधारित आहे हे नक्कीच आध्यत्मिक क्षेत्रासाठी अशोभनीय आहे. आणि अनेक दैवी देवता यांच्या संदर्भात पण अशाच पद्धतीनं ताल सुर लय बसवला जातो. हे मनोरंजन म्हणून ठिक आहे. पण अध्यात्म म्हणून योग्य नाही. आणि अध्यात्म आवश्यक आहे की मनोरंजन महत्वाचे आहे. यावर मंथनाची आवश्यकता आहे. हा प्रत्येकाचा व्यक्तिगत पातळीवरील विषय असला तरी सर्वांनी एक लक्ष्मण रेषा पाळली पाहिजे.
महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्राचा वसा आणि वारसा हा आध्यत्मिक परंपरेचा आहे. एकंदरीत महाराष्ट्रातील लोक जीवनावर अध्यात्माचा खूप मोठा प्रभाव आहे आणि तो असला पाहिजे. त्यामुळे महाराष्ट्रातील गावा-गावात कीर्तन, प्रवचन, रामायण, भगवद्गीता अशा अनुषंगाने प्रत्यक्षात तसेच सोशल मध्यमातून अनेक उपक्रम होत असतात आणि याच कार्यक्रमात अनेक आध्यत्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या माध्यमातून समाजप्रबोधन होत असते. याच दरम्यान लोकांचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी काही प्रमाणात विनोद पण करावे लागतात. मुळात विनोद हा चुकीचा विषय नाही. उलट लोकांचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी विनोद केला पाहिजे. यामध्ये गैर असं काही नाही. तसेच यामध्ये यत्किंचितही दुमत नाही. सध्याची लोकांची मानसिकता पाहता सुद्धा अध्यात्मिक ज्ञान, पूर्ण वेळ देणं म्हणजे जे काही नियोजित वेळ आहे तेवढा वेळ लोक ऐकू शकतील असं शक्य वाटतं नाही किंवा मग बहुधा ते लोकांच्या डोक्यावरून जातं. ही वास्तविक परस्थिती आहे आणि त्यामुळे अध्यात्मिक क्षेत्रात विनोदाचा शिरकाव झाला.
आध्यत्मिक मार्गदर्शन चालू असताना लोकांचा उत्साह कायम ठेवण्यासाठी जे विनोद आहेत ते अध्यात्म कार्यकक्षेच्या बाहेरील असले पाहिजे जेणेकरून बोलण्याच्या ओघात काही गडबड होणार नाही. हा कुणाला सल्ला नाही, उपदेश नाही परंतु प्रत्येकाने या विषयाची स्वअनुभूतीमधुन दखल घेतली पाहिजे आणि अध्यात्म व विनोद हे वेगळे असले पाहिजे. अध्यात्माचा विनोद होणार नाही याची दक्षता घेणं हेच महत्त्वाचे आहे.

**लेखक संतचरीत्र गृप महाराष्ट्र, राज्य (वनसगाव) चे सरचिटणीस तथा प्रसिद्धीप्रमुख आहेत.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# 'लॉस्ट अँड फाउंड'चा ट्रेण्ड आणणारा दिग्दर्शक मनमोहन देसाई

आधुनिक केसरी

**चित्रपट क्षेत्रात फारच कमी असे दिग्दर्शक आहेत, ज्यांनी स्वतःचा ट्रेण्ड आणला. त्यापैकी मनमोहन देसाई. जखमी आईला तीन-तीन मुले थेट रक्त देत आहे, हे वैज्ञानिक दृष्ट्या योग्य नसले तरी ह्या सीनमुळे प्रेक्षकांच्या मनावर काय परिणाम होईल याची जाणीव मनमोहन देसाई यांना होती आणि या सीनला लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. आजही तो सीन लोकांच्या लक्षात आहे आणि आजही तो सीन पाहताना जाणवत नाही की हे वैज्ञानिकदृष्ट्या योग्य नाही. लोकांच्या भावनिकतेची इतकी जबरदस्त पकड मनमोहन देसाई यांना होती. याच मानसिकतेतून 'लास्ट अँड फाऊंड'ची कॉन्सेप्ट मनमोहन देसाई यांच्या डोक्यात आली असावी.**

त्यांचे सिनेमे म्हणजे निव्वळ मनोरंजन पण भावनिक. लोकांची नस त्यांनी पकडली होती. कथेचा प्लॉट भावनिक ठेवायचा आणि निव्वळ मनोरंजन करायचे. अमिताभ बच्चन यांच्याशी मनमोहन देसाईचे चांगलेच सुर जमले होते. सुरुवातीला त्यांच्या चित्रपटासाठी नायक म्हणून अमिताभ बच्चन मनमोहन देसाईला कधीच आवडले नाहीत. निर्मात्याची इच्छा म्हणून नाईलाजास्तव 'परवरिश' सिनेमा करावा लागला, पण 'परवरिश'मधील अमिताभ बच्चन यांची अभिनय संपन्नता व त्यांची सेट वेळेवर येण्याची सवय (अमिताभ बच्चन आजही वेळेवर सेटवर पोहचतात) या गोष्टीमुळे अमिताभ मनमोहन देसाई यांना आवडू लागले. म्हणून त्यांनी 'परवरिश'चे चित्रिकरण सुरू असतानाच 'अमर अकबर अँथनी'ची घोषणा केली आणि 'परवरिश'च्या चित्रीकरणासोबतच "अमर अकबर अँथनी"चेही चित्रीकरण सुरू केले. दोन्ही चित्रपटाचं एकदाच चित्रीकरण सुरू होते. दोन्हींचे सेट आजुबाजूलाच होते. एकदा लंच ब्रेकमध्ये मनमोहन देसाई परवरिशचे चित्रीकरण करू लागले. तेव्हा अमिताभ मनमोहन देसाई यांच्या असिस्टंटला घेऊन "अमर अकबर अँथनी"मधील आयकॉनिक ठरलेला सीन "मिरर सीन" करून घेतला, तो सीन पाहून मनमोहन देसाई इतकं भारावले की त्यानंतर त्यांच्या सिनेमाचा नायक अमिताभ बच्चनच राहिले. या दोघांची केमस्ट्री जबरदस्त होती. एकेकाळी न आवडणारा नायक कायमस्वरूपी त्यांच्या चित्रपटाचा नायक बनला. आजही मनमोहन देसाई यांचं जेव्हा नाव







निघतं तेव्हा अमिताभ बच्चन डोळ्यासमोर येतातच. अमिताभला स्टारडम देण्यात मनमोहन देसाई यांचा महत्वाचा वाटा आहे. पहिले फिल्मफेअर अवॉर्ड अमिताभला "अमर अकबर अँथनी"नेच दिले. परवरीश, अमर अकबर अँथनी, सुहाग, नशीब, देशप्रेमी, कुली, मर्द असे सुपरहिट चित्रपट या जोडगोळीने दिले.

असं नव्हे की मनमोहन देसाई हे अमिताभ बच्चन अभिनित चित्रपटामुळे मुळेच हिट झाले. याआधी त्यांचे १५ सिनेमे हिट होते. बहुतेक बऱ्याच लोकांना माहीत नसावं की राज कपूर, नूतन अभिनित "छलिया" चित्रपट मनमोहन देसाई यांनी दिग्दर्शित केलेला आहे, म्हणून. हा मनमोहन देसाई यांचा दुसराच चित्रपट सुपर हिट ठरला होता. आजही या चित्रपटाची गाणी श्रवणीय आहेत. राजेश खन्ना अभिनित रोटी चित्रपट मनमोहन देसाई यांचाच. "रोटी" चित्रपटातील गाणीही तुफान गाजली आहेत. परत राजेश खन्ना अभिनित "सच्चा झूठा" याचीही गाणी तुफान गाजली. धर्मेंद्र व जितेंद्र अभिनित "धरमवीर" चित्रपट आजही ब्लॉकबस्टर आहे. या चित्रपटातील धर्मेंद्र यांच्या पेहरवाची आजही चर्चा होते. आजही तो पेहराव लोकांच्या लक्षात आहे. शम्मी कपूर अभिनित "ब्लफमास्टर" पण तुफान चाललेला. शेवटी शेवटी त्यांच्या कमरेचा त्रास प्रचंड वाढला होता. एकेदिवशी बाल्कनीत फिरत असताना ते पाय सटकून बाल्कनीतून खाली पडले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी ते ५७ वर्षाचे होते. या महान दिग्दर्शकाला माझा सलाम.

**सुरेश सिरसीकर**
9146040000

## मनमोहन देसाई यांचे चित्रपट

जनम जनम के फेरे (१९५७), छलिया (१९५९) ब्लफ मास्टर (१९६३) बदतमीज (१९६६), किस्मत (१९६८) सच्चा झूठा (१९७०) रामपुर का लक्ष्मण (१९७२) भाई हो तो ऐसा (१९७२) आ गले लग जा (१९७३) रोटी (१९७४) परवरिश (१९७७) धरमवीर (१९७७) चाचा भतीजा (१९७७) अमर अकबर अँथनी (१९७७) सुहाग (१९७९) नसीब (१९८१) देशप्रेमी (१९८२) कुली (१९८३) मर्द (१९८४) गंगा जमुना सरस्वती (१९८८) तूफान (१९८९) अनमोल(१९९३)

# ।। जावयांची तिरुपतीची सफर ।।



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**हॅलो मी पंढरपूरहून जगदीश कुलकर्णी बोलतोय... मेहूण्याचा फोन इतक्या सकाळी सकाळी? मी अस्वस्थ झालो...पण त्यांच्या बोलण्यात उत्साह, आनंद होता.. भाऊजी आपणं सर्व जावयांसाठी नि माझ्या सगळ्या बहिणींसाठी तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी सफर आयोजित केली आहे बरंका... जगदीशनी मोठ्या उत्साहात सांगितले. करोना, लाकडाऊन या सगळ्यांमुळे तीन वर्षे अशीच निघून गेली. आपण दिवाळीलाही जावयांना निमंत्रित करु शकलो नाही. म्हणूनच सर्व जावयांना बहिणीनांही घेऊन तिरुपती बालाजी, नंतर पंढरपूर, कोल्हापूर अशी पंधरा दिवसांची दे धमाल अशी सफर आयोजित केली आहे बरंका...**

सगळेजण तयार आहेतच, तुम्ही खूप बिझी असतात म्हणून तुमच्यावरच सारं अवलंबून आहे.
जगदीश तू आपल्या जावयांसाठी करतोय हे चांगले आहे पण...
आता पण..बीण नाही...
अरे.. जगदीश..साऱ्या सफरीसाठी खर्च खूप येईल...
भाऊजी तुम्ही कोणीही आपल्या खिशात हात घालायचा नाही. संपूर्ण खर्च मीच करणार आहे...
अरे आपणं बाराजण आहोत..लाख दिड लाख रुपये लागतील...
काळजीच कारण नाही... माझ्या जावयांसाठी दिवाळसण करण्याऐवजी ही देवदर्शन सफर आयोजित केली आहे बरंका...
जगदीश मोठ्या उत्साहात बोलून गेला...मग आमचं तर ठरलं..
" बॅग भरलो और निकल पडो...."
पाहता पाहता... बालाजी सफरीसाठी सोलापूरला सारे जावयी.. वय वर्षे ९४ असणाऱ्या सासूबाई.. आक्का त्याही सहलीत सहभागी झाल्या. सोलापूरहून तिरुपतीच्या रेल्वेमध्ये आमची एसी डब्यातील सुरेख व्यवस्था केलेली होती. तिरुपतीची आमची सफर सुरू झाली. जवळपास बारा तेरा तासांचा हा प्रवास. मग काय साऱ्यांच्या गप्पा सुरू झाल्या. आक्कांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते ऐकताना साऱ्या मुलींचे डोळे पाणावले. तनूजा, शैलजा, उज्वला, नयन साऱ्यांनीच
आपल्याकडील किस्से सांगून साऱ्यांना भासवले.
जगदीश, त्याची पत्नी शामलानी सफरीची जय्यत तयारी केली होती. प्रत्येक जावयांना आवश्यक गोष्टीसह फूड पॅकेट्सची मोठी बॅगच प्रत्येकाच्या हाती देवून सुखद धक्का दिला.
मग काय चारेमुरे खात गप्पा रंगतच गेल्या. नंतर गाण्याच्या भेंड्याचा खेळांनीतर धमाल आणली. आमचा उत्साह पाहून बाजूच्या डब्यातील मंडळीही गाण्याच्या भेंड्याच्या खेळात रंगून गेले.
कोरोनामुळे तीन वर्षे पर्यटन थांबलेच होते ना... त्यामुळे साऱ्यांच्या मनानं मनांतून उत्साह ओसांडून वहात होता हेच खरं. रात्र वाढतं गेली तसे सारेच झोपी गेले.
ए चाय...ए चाय... कॉफी... कॉफी...असे आवाज एकमेकांत मिसळून गेले... तसे सारेजण जागे झाले. तिरुपती स्टेशन आलेलं होतं.
चला आटपा... उठा आता... जगदीशचा आवाज कानावर आला... शुभ प्रभात...
सारेजणांना. "शुभप्रभात" म्हणत आपल्या उबदार शालीतून सारेजण बाहेर आले.नंतर सारेजण फ्रेश झाले. तिरुपती रेल्वे स्टेशन बाहेर जगदीशनी आधीच ठरवलेली बस आमची वाट पाहत उभीच होती. बसमध्ये बसून आधी हॉटेल गाठले. अतिशय सुंदर हॉटेलमध्ये



आम्हां साऱ्यांचीच सुरेख व्यवस्था करण्यात आली होती. साऱ्यांनीच ब्रेकफास्टवर ताव मारला. साऱ्याजणांनाच खूप भूक लागली होती. हेवी नास्ता झाला नि सारे ताजेतवाने होऊन गेले.
आमचं तिरुपती बालाजीच्या दर्शनाचे दुसरे दिवशीचे सकाळचे पास होते. मग आम्ही कालआस्ती मंदिर पाहण्यासाठी मार्गस्थ झालो. अतिशय भव्यदिव्य मंदिर.विलक्षण मोठे कोरीव खांब. अगणित कोरलेल्या सुंदर मूर्ती. फुलांची सजावट सारंच अवर्णनीय. त्या मंदिराच्या दर्शनानंतर इस्कॉन या श्रीकृष्ण मंदिरात आलो. श्रीकृषणाचे अतिशय सुंदर मंदिर. अतिशय भावपूर्ण मूर्ती. कमालीची स्वच्छता. सारंच मनं प्रसन्न करणारं. त्यानंतर हॉटेलमध्ये परतलो.
दुसरे दिवशी तिरुपती बालाजी दर्शनाचे सकाळचे पास होते. सकाळीच दर्शनासाठी रांगेत सारेजण उभे होतो. मनात ओढ होती कधी दर्शन होईल याची. रविवार असल्याने खूप भक्तांची गर्दी मंदिरात होती. जवळपास तीन तासांच्या प्रतिक्षेनंतर बालाजीच्या अतीशय सुंदर मूर्तीचे दर्शन झाले. अंतःकरण त्या दर्शनानी भरुन आलं. आमच्या साऱ्यांच्याच जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. एका आत्मिक समाधानाने आम्हा सगळ्यांची पाऊले हॉटेलकडे परतत होती.
हॉटेलवर येऊन फ्रेश होऊन नव्या उत्साहाने गोविंदराज पद्मावती देवीच्या मंदिरात गेलो. दक्षिणेतील प्रत्येक मंदिर अलौकिक वास्तू शिल्पाचे सुंदर उदाहरण आहे.पद्मावती देवीची मूर्ती. ते मंदिर सारंच अवर्णनीय आहे. साऱ्यांचेच मनं सुखावून गेले.
तिसरे दिवशी आम्ही पुन्हा एकदा नव्या उत्साहाने झकास डोसा, इडली-सांबरच्या नास्त्यावर ताव मारला नि तीन दिवस सुरेख राहण्याची व्यवस्था केलेल्या त्या हॉटेलचा निरोप घेतला. आमची मिनीबस सुवर्ण मंदिर वेल्हारच्या मार्गांवर गतीमान झाली.
तिरुपतीपासून १३० किलोमीटर अंतरावर असलेल्या सुवर्णमंदिर वेल्हारच्या महालक्ष्मी देवीच्या मंदिरात आम्ही सारेजण आलो. जवळपास दोन किलोमीटर मंदिराच्या परिसरात चालल्यानंतर मंदिराच्या जवळ आलो. पाण्याच्या मधोमध उभं असणारं हे महालक्ष्मीचे सुवर्ण मंदिर... डोळे दिपवून टाकणारे आहे. इतकं मोठं भव्यदिव्य मंदिर संपूर्ण सोन्याच्या पत्राने मडविण्यात आलेले आहे. जिकडे पहावें तिकडे सुवर्णाचा तो लखलखाट पाहून भक्तगण भारावून जातात. या सुवर्ण मंदिरावर पडलेली सूर्याची किरणे... सारंच तेजोमय होऊन गेलेले होते. त्या सुवर्ण मंदिराचे बाजूच्या पाण्यात पडलेलं प्रतिबिंब अवर्णनीय... अलौकिक... अप्रतिम दिसतं होतं.आम्ही सारेजण स्वर्गीय सुखाची अनुभूती अनुभवीत होतो हे बाकी खरं. वेल्हारच्या सुवर्ण मंदिर परिसरातून पाऊले, मन बाहेर पडण्यास तयार नव्हते.
तिरुपती बालाजी परिसराला निसर्ग देवतेचा वरदहस्त लाभलेला आहे असंच म्हणावं लागेल. इतकं सुंदर, स्वच्छ शहर, रमणीय शांत परिसर. कुठेही घाण नाही. कचऱ्याचे ढीग सोडा, कचराच दिसला नाही.
तिरुपती बालाजी सहलीच्या सुंदर सुखद आठवणी घेऊन आम्ही सारेजण पुन्हा रेल्वेच्या आमच्या एसी डब्यात येऊन बसलो. घड्याळात पहाटेचे चार वाजल्याचे वेळ सांगत होती. सारेजण आपापल्या स्लीपर कोच वर येऊन झोपी गेलो. सारेजणच खूप दमलेलो होतो. झोप कधी लागली हेही समजलें नाही. जवळपास चार तासांनी साऱ्यांनाच जाग आली.
ए चाय... कॉफीच्या ललकारी नी... सारेजण पुन्हा एकदा फ्रेश होऊन नास्त्यावर ताव मारला.. चहा कॉफीचाही आस्वाद घेतला... मग मैफिल जमली ती गाण्याच्या भेंड्याची... खूप खूप मजा आली. सुधीरच्या मिमिक्रीनी नि शशिकांतच्या विनोदी किस्यानी सारे मनमुराद हासले. वासुदेवराव नि मुकुंदनी अनेक गोष्टी सांगून अंतर्मुख करून गेल्या. गप्पांच्या ओघात सोलापूर रेल्वे स्टेशन कधी आले हेही समजलें नाही.
पाहता पाहता सोलापूर रेल्वे स्टेशन वर सारी मंडळी उतरली. कौशिक, प्रिती, अक्षदा, अंजू या साऱ्या मंडळींनी साऱ्यांनाच खूप मोलाची मदत केली. आमच्या साऱ्यांच्याच स्वागतासाठी आलेली होती.
सोलापूर रेल्वे स्टेशनवरून आम्ही सारेजण पंढरपुरी रवाना झालो. पंढरपुरात सारेजणांनी हॉटेल राधेय रेस्टॉरंट्समध्ये सहभोजनाचा आनंद घेतला. पंढरपुरात दुसरें दिवशी आमचे पांडुरंगाच्या पदस्पर्शाच्या दर्शनासाठीचे पासेस जगदीशनी आधीच काढून ठेवलेले होते. दुसरे दिवशी साऱ्या जावयांसह जगदीश, शामला, आक्कासह साऱ्यांनीच पांडुरंगाचे पदस्पर्शाने दर्शन घेतले नि आम्हा साऱ्यांचेच जीवन कृतार्थ झाल्याचे जाणवले हे बाकी खरं. नंतर कोल्हापूरला देवीच्या दर्शनासाठी जाऊन आलो.
गेल्या तीन वर्षांपासून आमच्या पैकी कोणीही कुठेही पर्यटकांसाठी बाहेर पडलेलो नव्हतो. आम्हां सगळ्यांच्या सासुबाई, जगदीश नि शामलाच्या आग्रहावरून ही अलौकिक "तिरुपती बालाजी सफर" घडवून आणली. आम्हां साऱ्यांच्याच जीवनात एक सुखद आठवणींची शिदोरी जगदीश नि शामलानी दिलेली होती. जगदीश नि शामलाचे ऋण व्यक्त करण्यासाठी माझे शब्दही अपुरे आहेत, हे बाकी खरं...

# बिरबलाची खिचडी

आधुनिक केसरी

बिरबलाची खिचडीथंडीचे दिवस होते. सम्राट अकबराने एके दिवशी एक अजब घोषणा केली. त्याच्या राजवाड्यासमोरच्या जलकुंडात रात्रभर कुणी उभा राहिल्यास त्याला शंभर सुवर्ण मुद्रा देण्यात येतील, अशी दवंडी पिटवली जाते. ती ऐकून एक गरीब माणूस ते साहस करायला तयार होतो. तो रात्रभर त्या जलकुंडात काकडत उभा राहतो. सकाळी अकबर येतो, तेव्हाही तो आपल्या जागेवर उभा असतो. पण अकबराची नजर जलकुंडाजवळ ठेवलेल्या एका छोट्याश्या दिव्याकडे जाते.

अकबर विचारतो, दिवा रात्रभर तेवत होता का? सेवक, होय म्हणतो. रात्रभर दिवा तेवत राहिल्याने जलकुंडात उभा राहणाऱ्या माणसास उब मिळाल्याचे अनुमान अकबर काढतो.आणि शंभर सुवर्ण मुद्रांचे बक्षीस देता येणार नसल्याचे बजावतो. तो गरीब माणूस बिचारी दुःखी होतो. त्याला वाटते की आता बिरबलच आपल्याला न्याय देईल. तो बिरबलाकडे जाऊन संपूर्ण घटना सांगतो. बिरबल त्याला म्हणतो, 'तू आता घरी जा. मी बघतो काय करायचे ते.'

दुसऱ्या दिवशी दरबार भरतो. रोज वेळेवर येणारा बिरबल आज आला नाही, म्हणून अकबर सेवकामार्फत बोलाविणे पाठवितो. सेवक जाऊन परत येतो व बिरवल खिचडी शिजवत असल्याचे सांगतो. बिरबल खिचडी शिजल्यानंतरच येणार असल्याने राजा दरबाराच्या कामास सुरवात करतो. दुपार झाल्यावरही बिरबल न आल्याने राजा सेवकाला पाठवितो. दूसरा सेवकही बिरबलाची खिचडी झालीच नसल्याचे सांगतो.



अकबराला आश्चर्य वाटते. दरबार संपतो तरी बिरबल येत नाही म्हणून अकबरच त्याच्या घरी जातो. तेथे गेल्यानंतर पाहतो तो काय. बिरबलाने छोटी चूल पेटवून बऱ्याच उंचीवर एका मडक्यात खिचडी शिजायला ठेवलेली असते. अकबर हसतो आणि म्हणतो, अरे बिरबल तू एवढा हुशार आणि चतुर. मग तुला एवढे समजत नाही, की खिचडी आणि विस्तवात एवढे अंतर असेल तर ती तापेल कशी?तेव्हा बिरबल म्हणतो, 'क्षमा असावी महाराज, दूरच्या दिव्याची उब घेऊन एखादा माणूस रात्रभर कडाक्याच्या थंडीत उभा राहू शकतो, मग याच न्यायाने खिचडी शिजायला काय हरकत आहे? राजाच्या चूक लक्षात येते. रात्रभर पाण्यात उभा राहणारया माणसाला तो तातडीने बोलावणे पाठवून शंभर सुवर्ण मुद्रांचे बक्षीस देतो.



## मुलांचा कलाविष्कार

**आलिया साजेद पटेल**
**औरंगाबाद वर्ग-8 वा**

# बालमनाचा हर्ष

आधुनिक केसरी

कधी कधी आनंद मिळणार या जाणिवेचाही आनंद मिळतो. जगात मनुष्याच्या पहिल्या श्वासापासून प्रगतीसाठी चढाओढ सुरु होते. यामुळेच अविश्रांत धडपड सुरू होते. पदोपदी ताण आणि मनस्तापही कळस गाठतो. दिवसागणिक परीक्षांची स्पर्धा प्रचंड वाढलीय. प्रत्येकाला आपला पाल्य पहिलाच यायला हवा ही अपेक्षा. मग मुलांना रेसमधल्या घोड्याप्रमाणे धावावे लागते. मग मनावरती दडपण असते ते प्रचंड अभ्यासक्रमाचे.

इच्छा असो वा नसो.. नको नको ते विषय वीट आणतात. असे अनेक विषय असतात की परीक्षा आटोपली की जीवनात पूढे कधीही त्याचा उपयोगही होत नाही अन्



आठवणही येत नाही पण त्याचा बोजड अभ्यासक्रम अक्षरशः बालमनाचा छळ करतो. बालपण हिरावले जाते.अशावेळी उद्याच्या रविवारच्या सुट्टीची जाणीव झाली की मुलांना हर्ष होणारच. एरवी पण सुट्टीची आतुरता आणि आनंद प्रत्येकाला असला तरीही मुलांना मात्र रविवारच्या सुट्टीचा आनंद आगळा. हा हर्ष मग अवर्णनीयच कसा हे सांगणारे बडबड गीत.

**एक नाही दोन नाही**
**बेरीज-वजाबाकी नाही**
**तीन नाही चार नाही**
**भूमितीची सजा नाही**
**दिवस उद्याचा सवडीचा**
**रविवार माझ्या आवडीचा ॥धृ॥**
**सोमवारचा असतो गणिताचा तास**
**गणिताच्या तासाला मी नापास**
**गणित विषय माझ्या नावडीचा**
**रविवार माझ्या आवडीचा ॥१॥**
**भलताच कठीण तो मंगळवार**
**डोक्यावर असतो भूगोलाचा भार**
**भूगोल विषय माझ्या नावडीचा**
**रविवार माझ्या आवडीचा ॥२॥**
**घेऊन तोफा आणि तलवारी**
**इतिहास येतो बुधवारी**
**इतिहास माझ्या नावडीचा**
**रविवार माझ्या आवडीचा ॥३॥**

**गीत : उमाकांत काणेकर**

## पावसात चिंब होऊया...!

चला रे गड्यांनो खेळूया
फुलांच्या बागेत जाऊया,
आनंदाने सारे नाचूया
फुलांवाणी सारे होऊया.

फुलांच्या बागेमध्ये भुंगे
ही फुलांभोवती फिरती,
तालावर नाच करुनी
गोड-मधूर गाणी गाती.

या पावसाच्या दिवसात
इंद्रधनुचे रंग पाहूया,
रिमझिम पावसामध्ये
सारे ओले-चिंब होऊया

पावसामध्ये टपटप
पडलेल्या गारा वेचूया,
हातामध्ये गारा घेऊन
गारा खात-खात नाचूया.

या साचलेल्या पाण्यामध्ये
स्वतःचे प्रतिबिंब पाहूया,
सांज होण्याच्या आगोदर
आपापल्या घरी जाऊया...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## बाग

सुंदर फुलांनी
बाग बहरली
हर्ष उल्हासाने
सर्वांची मनं मोहरली
गुलाब दिसे
किती हसरा
जणू सांगतो
मनातले दुःख विसरा
लालच लाल
दिसती जास्वंदी
कळ्या फुलांनी
झुकली फांदी
वाऱ्याच्या तालावर
जाई जुई हसती
प्राजक्ताचा सडा
झाडाभोवती दिसती
शेवंतीला शोभे
पिवळा घागरा
हसून गंध सोडे
पांढराशुभ्र मोगरा
प्रत्येक फुलांचे
वेगवेगळे रंग
नित्य खेळावे वाटते
त्यांच्या संग

-रवींद्र व्ही. चालीकवार, महागाव,
जि. यवतमाळ, मो.9011559106

# हा नोकर चोर आहे

आधुनिक केसरी

एके दिवशी एक श्रीमंत व्यापारी बिरबलाकडे आला आणि म्हणाला, माझ्या घरी कोणीतरी चोरी केली आहे. माझे दागिने चोरले आहेत. माझ्या घरी दहा नोकर आहेत. त्यांच्यापैकीच कोणीतरी ते चोरले असल्याचा माझा संशय आहे. मी त्यांच्यापैकी सगळ्यांना विचारले पण त्यातील एकजणही कबूल झाला नाही. कृपा करून तुम्ही यातून काहीतरी मार्ग काढा.



बिरबल त्या व्यापाऱ्याच्या घरी गेला. त्याने त्या दहाही नोकरांना एकत्र बोलावले व त्यांना म्हणाला, की माझ्याकडे दहा जादूच्या काठ्या आहेत. त्या मी तुम्हाला देत आहे. या काठ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व काठ्या समान आहेत. मी त्या तुम्हाला देत आहे. आज तुमच्याकडे ठेवा व उद्या मला परत करा. ज्याने चोरी केली असेल, त्याची काठी रात्रीत एक इंचाने वाढेल.

दागिने चोरणारा नोकर घाबरला. आपली चोरी पकडली जाईल म्हणून तो काठी एक इंचाने कापतो. त्याला वाटते की सकाळी ती परत एक इंचाने वाढेल व कुणाला काही कळणार नाही. दुसऱ्या दिवशी बिरबलाने नोकरांच्या हातातील काठ्या पाहिल्या.

त्याला एका नोकराची काठी छोटी झाल्याचे आढळले. त्याच्याकडे बोट दाखवत बिरबल म्हणाला, 'हा नोकर चोर आहे. त्यानेच तुमचे दागिने चोरले.' शेवटी त्या नोकरानेही ते कबूल केले व त्या व्यापाऱ्याचे दागिने परत केले.



# काय ही वेळ : गंगापूर पं.स.चे कर्मचारी वाळवताहेत भिजलेली कागदपत्रे

## सा.बां.च्या दुर्लक्षाने लेखा विभागाचे छत कोसळल्याचा परिणाम!

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** सततचा पाऊस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्ष यामुळे गंगापूर पंचायत समितीच्या लेखा विभागाच्या कार्यालयाचे सिंलिंग कोसळले असून, छताला पावसाच्या पाण्याने गळती लागल्याने शेतकऱ्यांनी विविध योजनेची दाखल केलेली कागदपत्रे भिजत आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांना काम सोडून कागदपत्रांवरील पाणी पुसण्याची वेळ आली आहे. दरम्यान, या इमारतीची दुरुस्ती त्वरित करावी नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा माजी बांधकाम सभापती संतोष जाधव यांनी दिला आहे.
गेल्या आठ दिवसांपासून गंगापूर तालुक्यात दररोज पाऊस पडत असल्याने पंचायत समितीच्या लेखा विभागाच्या कार्यालयातील छतावर साचलेले पाणी बाहेर न पडता कार्यालयात पडत आहे. या पाण्यामुळे लेखा विभागाच्या लेखाधिकारी यांच्या केबिनचे सिंलिंग तुटून खाली पडले. सुदैवाने या ठिकाणी कोणी नसल्यामुळे पुढील अनर्थ टळला. दरम्यान, त्याच विभागाच्या दुसऱ्या केबिनमध्ये बहुगुणी लागवड, गायगोठे व इतर योजनांच्या शेतकऱ्यांनी जमा केलेल्या फाईल्स आहेत. यातील काही फाईल मंजूर करण्यात आलेल्या तर काही फाईल मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. या सर्व फाईल ठेवण्यासाठी पुरेसे कपाट नसल्यामुळे या फायली टेबलवर, खाली जागा मिळेल त्या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या आहेत. केबिनचे सिलिंग कोसळल्यामुळे पावसाचे



पाणी छतातून टपकत असून, हे पाणी फायलींवर पडत आहे. त्यामुळे फायली खराब होत आहेत. या फायली ठेवण्यासाठी दुसरी जागा नसल्यामुळे आहे त्याच ठिकाणी या फायली वळवण्याचे काम कर्मचाऱ्यांना करावे लागत आहे. विशेष म्हणजे यासाठी त्यांना कार्यालयातील इतर कामे सोडावे लागत आहे.
सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या इमारतीच्या छताची दुरुस्ती करण्याबाबत पंचायत समितीच्या वतीने संबंधित बांधकाम विभागाला कळविण्यात आले होते. मात्र, त्यांनी दखल न घेतल्याने अखेर आता कर्मचाऱ्यांनी एकात्मिक बालविकास अधिकारी कार्यालयाच्या छताची स्वखर्चाने डागडुजी सुरू केली आहे. मात्र, या खोल्यांची दुरुस्ती लवकर नाही झाली तर शेतकऱ्यांच्या अनेक फायली खराब होऊन अनेक शेतकरी विविध योजनेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

> **“ गंगापूर तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी बहुगुणी लागवड, गायगोठे व विविध योजनांच्या लाभासाठी अनेक कागदपत्रे जमा करून पंचायत समितीकडे फाईली मंजुरीसाठी दिलेल्या आहेत. परंतु, या कार्यालयात पाणी पडत असल्याने कागदपत्रे खराब होत आहेत. या फायलींमधील कागदपत्रे खराब झाल्यास शेतकऱ्यांना विविध लाभांपासून वंचित लागेल. त्यामुळे या कार्यालयाची दुरुस्ती लवकर करावी नसता लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल, याची नोंद घ्यावी.**
> **संतोष जाधव, माजी बांधकाम सभापती, जिल्हा परिषद**

> **“ अनेक वेळा बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी व तोंडी सांगूनही या इमारतीची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. शिवाय फायली ठेवण्यासाठी कपाट अपुरे पडत आहेत. त्यामुळे आम्हाला विविध योजनांच्या फाईल्स टेबलावर व भिंतीला लावून ठेवाव्या लागतात. फाईल्स ठेवण्यासाठी कपाट उपलब्ध करून देण्यात यावे व छतावरुन पडणाऱ्या पाण्याचा बंदोबस्त करावा.**
> **अनिल रोकडे, कक्ष अधिकारी**

# वणीच्या ‘हर्षल’ने बनविली स्वयंचलित ‘स्वानिक कार’

## १५० रुपयात धावते २५० किलोमिटर, प्रदूषणाला बसेल आळा

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** सध्याच्या काळात वाहन वापरणाऱ्यांची संख्या वाढली असून, दररोज हजारो वाहने रस्त्यावरून धावत आहे. वाहनातून निघणाऱ्या धुरामुळे प्रदुर्षण वाढले असून, नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच पेट्रोल व डिझेलचे दर १२० रुपयांवर पोहचले आहे. यावर उपाय म्हणून वणी येथील तल्लख बुध्दीच्या हर्षल नक्षणे नामक युवकाने आपल्या कुणाल आसुटकर नावाच्या मित्राच्या मदतीने अफलातून अशी प्रदुषण मुक्त स्वयंचित ‘स्वानिक कार’ तयार केली आहे.
वणी शहरात हर्षल महादेव नक्षणे या युवकाने एम टेक पर्यंत शिक्षण घेतले आहे. या युवकाचे एक स्वप्न होते की, भारताकडे स्वतःची अशी सुपरकार असली पाहिजे. जी शून्य प्रदूषण करते आणि स्वतः धावण्यासाठी सक्षम असली पाहिजे. परवडणाऱ्या किमतीत ग्रीन हायड्रोजन ऊर्जा वापरणे आणि अपघात आणि मानवी चुका कमी होईल अशी कार हवी.
त्या दृष्टीकोणातून हर्षल नक्षणे याने AICARS.IN या नावाने कंपनी रजिस्टर केली आहे. कुणाल आसुटकर या विज्ञान शाखेत भाग तीन ला शिक्षण घेत असलेल्या बालपणीच्या मित्राच्या मदतीने स्वानिक वन (SONIC ONE) कार बनविण्याचे काम सुरु केले.



गेल्या काही दिवसापूर्वीच ही कार तयार झाली आहे. हायट्रोजन गॅसवर चालविणारी ही कार आहे. सेल्फ ड्रायव्हींगसाठी संगणक तयार केले आहे. ड्रायव्हरविना ही कार चालणार आहे. आपल्याला ज्या मार्गाने व ज्या ठिकाणी जायचे आहे तो मार्ग निवडा त्या ठिकाणी ही कार पोहचवणार आहे. एक लिटर हायट्रोजन (किंमत १५० रुपये) मध्ये २५० कि.मी. धावणार आहे. त्यामुळे पेट्रोल व डिजेलवर चालणाऱ्या वाहनापासून सुटका होणार आहे. या कारने कुठल्याही प्रकारचे प्रदुषण होणार नाही.

**वणीतच बनविली कार, २५ लाख खर्च**

स्वानिक वन ही सुपर कार तयार करण्यासाठी लागणारे सुटे भाग वणीतच तयार केले आहे. फक्त कारसाठी लागणारे काच व टायर या वस्तू अहमदाबाद येथून खरेदी करण्यात आले. प्रायोगिक तत्वावर ही कार तयार केली असून, त्यासाठी तब्बल २५ लाख रुपये खर्च आला आहे. इंटरनेट सेवा पुरविण्याच्या व्यवसायातून मिळविलेल्या पैशातून ही कार बनविल्याची माहिती हर्षल नक्षणे यांनी दिली. सेल्फ



ड्रायव्हींग व हायट्रोजन फ्युल सिंस्टमचे पॅटेट नोंदणी केली आहे. १०० कार तयार झाल्यानंतर ही कार २० ते ४० लाख किंमतीत विक्रीसाठी उपलब्ध राहणार असल्याची माहिती नक्षणे यांनी दिली.

# गर्भाशयाच्या गाठीची शस्त्रक्रिया यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** आज स्त्री रुग्णालय नेकनुर येथे महात्मा ज्योतीराव फुले योजनेअंतर्गत वैद्यकीय अधीक्षक स्त्रीरोगतज्ञ डॉ.आशिलाक शिंदे, स्त्रीरोगतज्ञ डॉ.अरुण घुगे व भुलतज्ञ डॉ.रेणुका संदीकर यांनी अतिशय गुंतागुंतीची गर्भाशयाच्या पिशवीची बिनटाक्याची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. शस्त्रक्रियेच्या यशस्वीतेसाठी रुग्णालयातील श्रीमती थोरात, सूर्यकांत काळे, सपना शिंदे, कालिका, ओ.टी सहाय्यक, परमेश्वर बांगर व पंडित मामा यांनी शस्त्रक्रियेसाठी जवळपास 3 तास मोठे परिश्रम घेऊन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली व वैद्यकीय समन्वयक डॉ.दुर्गेश जोशी, आरोग्यमित्र रंजित बांगर यांनी तांत्रिक कामकाज पाहिले.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
✲ व्हाट्सप संपर्क ✲
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016

# शब्दगंध साहित्य संमेलन नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणार

## प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र फंड यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** पंधरावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये घेण्यात येणार असुन त्यापूर्वी सर्व तालुक्यामध्ये तालुकास्तरीय विविध साहित्यिक उपक्रम व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती शब्दगंधचे प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र फंड यांनी दिली.
शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य संस्थेची सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली कोहिनूर मंगल कार्यालयात कवी चंद्रकांत पालवे, मार्गदर्शक ज्ञानदेव पांडूळे, माजी अध्यक्ष प्रा.डॉ.शंकर चव्हाण, धुळे जिल्हा प्रतिनिधी प्रभाकर सुर्यवंशी, संस्थापक सचिव सुनील गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला.
यावेळी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. विविध पुरस्कार प्राप्त व नैपुण्यधारक साहित्यिकांचे अभिनंदन करण्यात आले. श्रीरामपूर तालुकास्तरीय शाखा कार्यकारी मंडळास मान्यता देण्यात आली. एक एप्रिल २०२२ पासूनच्या जमा खर्चास मान्यता देण्यात आली. नवीन सभासदांना मान्यता देण्यात आली. पंधरावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे आयोजन नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये करण्याचे ठरले. राज्यस्तरीय



शब्दगंध साहित्य पुरस्कार निवड परीक्षण समितीची निवड करण्यात आली.
यावेळी कार्याध्यक्ष प्रा.डॉ.अशोक कानडे, खजिनदार भगवान राऊत, उपाध्यक्षा प्राचार्या डॉ.गुंफा कोकाटे, कार्यवाह सुभाष सोनवणे, प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र फंड, शेवगाव तालुकाध्यक्ष हरिभाऊ नजन, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष लेविन भोसले, राहुरी तालुका कार्याध्यक्ष जयश्री झरेकर, कोपरगाव चे प्रमोद येवले, पारनेर च्या स्वाती ठुबे, सहसचिव नेवासे चे सुनीलकुमार धस, सोलापूर जिल्हा प्रतिनिधी प्रशांत वाघ, प्राचार्य अशोक ढगे, राजेंद्र पवार, चिलेखनवाडी चे सरपंच लेखक भाऊसाहेब सावंत, राज्य संघटक शर्मिला गोसावी, शहाराम आगळे, आर.आर. माने, राजेंद्र पवार, किशोर डोंगरे, डॉ.कैलास दौंड, कृष्णकांत लोणे, बबनराव गिरी यांच्यासह अनेक सभासद, हितचिंतक उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी केले. सुत्रसंचालन भगवान राऊत यांनी केले तर शेवटी सुभाष सोनवणे यांनी आभार मानले. यावेळी अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी मनोगत व्यक्त केले.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# असंसदीय शब्दांची यादी दिली, पण अंमलबजावणी करणार नाहीत !

## त्यांचे आदेश नेमके काय आहेत, हे उद्या दिल्लीत गेल्यावर बघितले जातील : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** १८ जुलैपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनामध्ये असंसदीय शब्द वाढवण्यात आले आहेत. त्याची यादी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी तयार केली आहे. पण त्यांचे स्टेटमेंट मी आज वर्तमानपत्रात वाचले. यावर अंमलबजावणी करणार नाही, असे अध्यक्षांनी म्हटले आहे. त्यांचे आदेश नेमके काय आहेत, हे उद्या दिल्लीत गेल्यावर बघितले जातील, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आज येथे म्हणाले.
आज सकाळी ११ वाजता येथील विमानतळावर पवार यांचे आगमन झाले. तेथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर ते हॉटेल रेडिसन ब्लूकडे रवाना झाले. तेथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी उपरोक्त प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांच्यासोबत माजी खासदार सुबोध मोहिते, माजी मंत्री रमेश बंग, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे, प्रशांत पवार आदी होते. आज पवार यांचा नागपुरात मुक्काम



असून उद्या ते रवाना होणार आहेत. आज येथे विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव नामकरण करण्याच्या महाविकास आघाडी सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. मुख्यमंत्रिपदावरून पायउतार होताना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने घेतलेले सर्व निर्णय रोखण्याचे आदेश नव्या सरकारने दिले असून, मुख्यमंत्री या सर्व निर्णयांचा फेरआढावा घेणार आहेत. दरम्यान याबाबत विचारले असता, शहरांच्या नामांतराबाबतचा प्रश्न राज्य सरकारलाच विचारायला हवा, असे म्हणत त्यांनी अधिक भाष्य करण्याचे टाळले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी असंसदीय शब्दांची यादी तयार केली आहे पण त्याची अंमलबजावणी करणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात त्यांचे विधान वाचले आहे पण नेमके आदेश काय आहेत. ते बघितले जातील आणि त्यावर सर्वपक्षीय नेते विचार विमर्श करतील आणि त्यानंतर प्रतिक्रिया देण्यात येईल, असेही ते म्हणाले. खासदारांना संसद भवनात धारणे, प्रदर्शन करण्यावर बंदी आणण्यात आली आहे. या निर्णयावर दिल्लीत आम्ही सर्व राजकीय पक्षाचे नेते एकत्र बसून विचार करू, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. सोबतच असंविधानिक शब्दांची नवी यादी बनवण्यात आली आहे त्यावरसुद्धा काय करायचे, ते आम्ही बघू असही ते म्हणाले. शिवसेना नेते खा. संजय राऊतही कालपासून नागपूर येथे आले असून शिवसेना नेते कार्यकर्तेची भेट घेणे सुरू आहे. दोघेही एकाच हॉटेलला थांबलेले आहे. रेडिसन ब्लु मध्ये यांची चांगली चर्चा नागपुरात आहे.

### राज्यात सध्या दोघांचेच कॅबिनेट : संजय राऊत

शिवसेनेतील बंड आभासी आहे. ५६ वर्षांत पक्षाने अनेक संकटे व वादळे बघितली. अनेक प्रसंगांतून पक्ष सुखरूप बाहेर पडला. सद्यस्थितीत सरकार अस्तित्वात आलेले नाही, आज दोघांचीच कॅबिनेट झाले. १६ आमदारांवर अपात्रतेची तलवार असताना शपथ घेणे बेकादेशीर, घटनाबाह्य आहे, असा पुनरुच्चार शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी केला.
राऊत दोन दिवसांच्या नागपूर दौऱ्यावर आले असता विमानतळावर पत्रकारांशी बोलत होते. पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी येथे पाठविले आहे. पक्षाच्या कामासाठी आलो, सगळी स्थिती 'जैसे थे' आहे. स्वागतासाठी सर्व आले, असेच चित्र संपूर्ण राज्यात आहे, असा दावा त्यांनी केला. खासदार कृपाल तुमाने व त्यांचे कार्यकर्ते आले नाहीत, याकडे लक्ष वेधले असता, इथले कुणीही गेलेले नाही. मी शिवसैनिकांबाबत बोलतो आहे. कार्यकर्ते कुणाचे व्यक्तिगत नाही तर पक्षाचे असतात. रामटेक विधानसभा मतदारसंघातूनही मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते आले. कोण आले, कोण गेले याकडे वेळ देण्याऐवजी पक्ष वाढवायचा आहे, असेही ते म्हणाले. पेट्रोल, डिझेलवरील कर कमी करण्याच्या निर्णयाने जनतेला दिलासा मिळेल. एखाद्या सरकारने असा निर्णय घेतल्यास त्याचे स्वागत करायला हवे, असे सांगून खासदार राऊत म्हणाले, ठाकरे सरकारने जनतेच्या हिताचे निर्णय घेतले. मात्र, दिवस बदलतात, भविष्यात सत्तांतर होत असते. त्यामुळे विरोधासाठी विरोध असे काम करू नये.



ओंकार योगसाधना व निसर्गोपचार केंद्र यांच्या वतीने गुरूपौर्णिमा निमित्याने योगतज्ञ रमेश पांडव यांचे महिलांसाठी योगाची किती आवशकता या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. केंद्र संचालिका रोहिणी कुलकर्णी यांनी प्रास्तविक केले. याप्रसंगी रमेश पांडव व डॉ. हरिशंद्र झिंझुर्डे पाटील यांचे सत्कार करण्यात आले. सुत्रसंचालन मनोरमा बोराडे यांनी केले तर परिचय सुवर्णा गीते व आभार मंजिरी मुळे यांनी मानले. गुरुपद निशा झिंझुर्ड पाटील हिने सादर केले, याप्रसंगी सर्व योगसाधिका उपस्थित होत्या.



## डॉ.संजय सांभाळकर यांचा निवडीबद्दल सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक तथा दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. संजय सांभाळकर यांची विद्यापीठातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राच्या संचालकपदी फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीस यशस्वी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी ज्येष्ठ नेते राजु खाजेकर, मातंग एकता आंदोलनाचे औरंगाबाद (संभाजीनगर) जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, युवा नेते योगेश दणके, गजानन मानकर, भरत मानकर, सुरेश चंदनशिव आदींची उपस्थिती होती.



## रझा मुराद यांच्या हस्ते 'मोहब्बत के अल्फाझ' म्युझिक व्हिडिओ बीफोरयू म्युझिकवर लाँच

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** निर्माता रणवीर गेहलोत आणि दिग्दर्शक अझहर हुसैन यांच्या "मोहब्बत के अल्फाज" चा म्युझिक व्हिडिओ रझा मुराद यांच्या हस्ते सन शाइन स्टुडिओ, मुंबई येथे भव्य पद्धतीने लाँच करण्यात आला. सुफियान कपाड़िया आणि प्रिया सिंग यांचा म्युझिक व्हिडिओ बीफोरयू म्युझिक वर रिलीज झाला आहे, ज्याला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. दिग्गज अभिनेते रझा मुराद, सुनील पाल, राजकुमार कनोजिया, केके गोस्वामी अभिनेते राज चौहान आणि संगीत संयोजक विक्रम के विक्रम यांच्यासह अनेक चित्रपट व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीने म्युझिक व्हिडिओचे लॉन्चिंग करण्यात आले. या व्हिडिओमध्ये प्रिया सिंग आणि सुफियान कपाड़िया यांनी अभिनय केला आहे. या खास निमित्ताने अभिनेता सुफियान कपाड़ियाचा वाढदिवसही केक कापून साजरा करण्यात आला.
याप्रसंगी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते रझा मुराद यांनी या व्हिडिओचे खूप कौतुक केले आणि अभिनेता सुफियान कपाड़िया आणि अभिनेत्री प्रिया सिंग यांना व्हिडिओमधील त्यांच्या अप्रतिम अभिनयासाठी शुभेच्छा दिल्या! यासोबतच निर्माता रणवीर गेहलोत आणि दिग्दर्शक अझहर हुसेन यांचेही खूप कौतुक झाले! ते म्हणाले की, व्हिडिओमध्ये अतिशय प्रेक्षणीय लोकेशन्सचा वापर करण्यात आला आहे, जो आजच्या युगात म्युझिक व्हिडिओमध्ये क्वचितच पाहायला मिळतो! अझहर हुसैन दिग्दर्शित, मोहब्बत के अल्फाज हे गाणे रणवीर गेहलोत यांनी तयार केले आहे तर या संगीत अल्बमचे संकल्पना डिझायनर आणि सहयोगी दिग्दर्शक नाझ काझी आहेत. निर्माता रणवीर गेहलोतने सांगितले की, ही एका आर्मी ऑफिसरची प्रेमकथा आहे. ज्याचे सुंदर चित्रीकरण केले आहे. गाण्यात उत्कृष्ट लोकेशन्स आहेत आणि दोन्ही कलाकारांनी अप्रतिम काम केले आहे.
या रोमँटिक गाण्याचे संगीत साउंड ट्युनिंग म्युझिक गीतकार वकील कुरेशी आणि गायक शिवांगी शर्मा आणि हरमन नाझिम यांचे आहे. गाण्याचे कॅमेरामन अजहर शेख, अतिरिक्त डीओपी संतोष हंकारे, संपादक अभिराज यादव, प्रॉडक्शन मॅनेजर शाहिद खान, सहाय्यक दिग्दर्शक मोहित गुप्ता, स्टिल फोटोग्राफर शुभम मराठे. ज्ञानलक्ष्मी प्रॉडक्शन आणि रेड ॲसिड फिल्म्सच्या बॅनरखाली याची निर्मिती करण्यात आली आहे.
या व्हिडिओला मिळालेल्या प्रतिसादाने दिग्दर्शक अझहर हुसैन खूप आनंदी आणि उत्साहित आहे. बीफोरयू म्युझिकवर रिलीज झालेल्या या अल्बमला प्रेक्षक भरभरून प्रेम देत आहेत, त्याबद्दल मी सर्व संगीतप्रेमींचे आभार मानतो असे तो म्हणतो. निर्माते रणवीर गेहलोत यांनीही हे गाणे बनवण्यात कोणतीही कसर सोडली नाही, त्यामुळे हे गाणे खूप भव्य झाले आहे. आम्ही तुम्हाला सांगूया की दिग्दर्शक अझहर हुसैनकडे अनेक आगामी प्रोजेक्ट्स आहेत आणि तो अनेक म्युझिक व्हिडिओ देखील दिग्दर्शित करत आहे.
यावेळी पाहुण्यांना पवित्रम डायमंड ज्वेलरीतर्फे दहा हजार रुपये किमतीच्या भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. मुंडे मीडियाने (पीआर) या पक्षाची जबाबदारी चोख बजावली.

## 'एक झाड लावा, सेल्फी काढा, बक्षीस मिळवा'

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाऊंडेशन व जीवन गौरव शैक्षणिक मासिकाच्या वतीने 'एक झाड लावा, सेल्फी काढा, बक्षीस मिळवा' या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. औरंगाबाद शहरातील प्राथमिक माध्यमिक शाळा यात सहभागी होऊ शकतात. उत्कृष्ट सेल्फी फोटोला प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक म्हणून आकर्षक स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र, एक झाड मान्यवराच्या हस्ते देण्यात येणार आहे. सहभागी शाळेना संस्थेच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र म्हणून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या आवारामध्ये एक झाड लावून सेल्फी काढून संस्थेच्या व्हाट्सअप नंबर 8888125610 वरती आपल्या शाळेचे पूर्ण नाव पत्ता मोबाईल नंबर सहित कळवायचे आहे.
ही स्पर्धा निशुल्क औरंगाबाद शहरातील प्राथमिक माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खुली असून याचे नियम व अटी पुढील प्रमाणे आहेत.
झाड देशी असावे, रोपटं लावतांनाचा फोटो काढताना अडवा मोबाईल धरावा, संपूर्ण रोपटं आणि आपल्या सर्वांचा चेहरा दिसेल असा सेल्फी असावा, सेल्फी सोबत आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांचे नाव, शाळेचा पत्ता, मोबाईल नंबर माहिती पाठवावी : कोणते झाड लावले त्याचे नाव, माहिती लिहून दिनांक 15 ऑगस्ट 2022 पर्यंत पाठवायची आहे. प्रथम, द्वितीय, तृतीय निवड झालेल्या शाळेचे नाव व सेल्फी फोटो विविध दैनिकातून प्रसारित करण्यात येईल, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रामदास वाघमारे यांनी कळविले आहे.



# आ.बच्चू कडूंना नव्या मंत्रिमंडळात समाजकल्याण खाते मिळावे म्हणून योगेश्वरी देवीला अभिषेक : अशोक गंडले

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** सर्वसामान्यांसाठी, गोरगरीब दीनदलित-पीडित आणि विशेषतः अपंगाचे कैवारी म्हणवणाऱ्या माजीमंत्री आ. बच्चू कडू यांना उद्याच्या नव्या मंत्रिमंडळात समाजकल्याण तथा सामाजिक न्याय व विधी हे खाते मिळावे म्हणून या ठिकाणी प्रहार संघटनेच्या वतीने अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवीला अभिषेक करून साकडे घालण्यात आले. प्रार्थना करण्यात आली, अशी माहिती प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अशोक गंडले यांनी दिली.




**बहुसंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अभिषेक; दिव्यांगांची मोठी उपस्थिती**

वयाच्या 14-15 व्या वर्षापासून मित्र-शेजारी-गाव आणि परिसरातील लोकांसाठी जगत, सामाजिक कार्य करत आलेल्या बच्चू कडू यांचा बघता-बघता समाजकारणातुन राजकारणात प्रवेश झाला आणि राजकारणात शिवसेनेतून केलेली सुरुवात सोडता आजतागायत अगदी रोखठोकपणे प्रखर भूमिका ठेवत बच्चू कडू हे कोणत्याही राजकीय पक्षात दाखल न होता स्वतःचाच प्रहार पक्ष-संघटना निर्माण करून आजही अपक्ष म्हणून तीन-चार वेळा आमदार ही राहिलेले आहेत. नुकत्याच बरखास्त झालेल्या आघाडी सरकारमध्ये बच्चू कडू हे राज्यमंत्री होते त्यांच्याकडे शिक्षण-सहकार व इतर खात्यांचा कारभार होता. परंतु खऱ्या अर्थाने त्यांच्या आत्तापर्यंतच्या कार्याचे मूल्यमापन केले तर ते सर्वसामान्य-गोरगरीब-शेतकरी-दीनदलित-पीडित आणि विशेष करून दिव्यांगांसाठी मोठ्या स्वरूपात काम करत आलेले आहेत. एवढेच नाही तर महाराष्ट्रातील दिव्यांगांचे कैवारी म्हणून ओळखले जायचे. परंतु ती ओळख अलीकडच्या दोन-तीन वर्षात पुसली गेली असून आता अखंड हिंदुस्थानातील दिव्यांगणांचे एकमेव कैवारी म्हणून माजीमंत्री आ. बच्चू कडूंची देशभरात ओळख निर्माण झालेली आहे. त्यांच्या या कार्याचा आलेख पाहता सबंध राज्यभरातील सर्वसामान्य आणि दिव्यांगांना त्यांच्या संबंधित असलेल्या समाजकल्याण खात्याचे मंत्री आ. बच्चू कडू व्हावेत अशी मनोभावी ईच्छा-अपेक्षा निर्माण झाल्याने त्यांनी उद्याच्या शिंदे-फडणवीस सरकारमधील मंत्रीमंडळात आमचे दैवत बच्चू कडू यांना समाजकल्याण तथा सामाजिक न्याय व विधी हे खाते मिळावे या अपेक्षेने त्यांनी भक्तांचे शक्तीपीठ-भक्तीपीठ असलेल्या अंबाजोगाई येथील मंदिरात देवीचरणी अभिषेक करून तिला साकडे घातले. या अभिषेकाच्या कार्यक्रमासाठी बहुसंख्य महिला-पुरुष मिळून कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. परंतु या ठिकाणी उल्लेखनीय बाब अशी की, मोठ्या प्रमाणात दिव्यांगांची उपस्थिती नजरेत टिपण्या ईतपत होती.

यावेळी प्रहार संघटनेच्या वतीने प्रहार संघटना महाराष्ट्राचे समन्वयक गुणाले सर, संभाजी लांडे, अंबाजोगाई शहराध्यक्ष अशोक गंडले, बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुजीत वेडे, बीड जिल्हाध्यक्ष रघुनाथ तोंडे, जिल्हा उपाध्यक्ष शेख फेरोज, जिल्हा संघटक जहांगीर पठाण, जिल्हा प्रवक्ता मुखीद शेख, खंबीर मार्गदर्शक दिलीप स्वामी, परमेश्वर रदवे, प्रदीप घणघाव, नवनाथ घणघाव, भास्कर भगतकर, भैया शिंदे व सर्व महिला कार्यकर्त्या आणि प्रहार संघटनेचे ईतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# कन्नड तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा अजब कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तहसिल कार्यालयातील सत्तेजित आव्हाड, डि.एफ. सोनवणे, आर.टी. बनसोड, सतिष शिंदे यांचा कार्यालयातील तीन वर्षाचा निर्धारीत कालावधी संपलेला असून शासन नियम व निर्णयाप्रमाणे उक्त कर्मचारी हे बदलीस पात्र विचार केल्यास वरील कर्मचारी जिल्हा बदलीस पात्र आहेत. तसेच कन्नड तालुक्यातील प्रदिर्घ सेवेनंतर बदली झालेले तलाठी विकास वाघ हे प्रशासनावर राजकीय दबाव आणून पुन्हा तालुक्यात बदलुन येण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यास नागरीकाचा विरोध आहे. कायद्यानुसार कार्यालयातील कालावधी पूर्ण करून सुद्धावरील कर्मचारी कार्यालयात कार्यरत असुन खुर्चीलाच चिटकुन बसले आहेत.

**शासन नियमाप्रमाणे काही कर्मचारी बदलीस पात्र असून बसले खुर्चीला चिकटून**



त्यांची नियम व कायद्यानुसार जिल्ह्यातून व कार्यालयातून बदली होणे आवश्यक आहे. करीता मुख्यमंत्री सचिव कार्यालयाला छावा संघटनेचे उपजिल्हा अध्यक्ष आरून गायके यांनी निवेदन दिले असून हेच कर्मचारी बदली आदेश प्राप्त होऊनही वैयक्तीक लाभाकरीता खुर्ची न सोडणारे व गौणखनिज तस्काराशी हातमिळावणी करून शासनाचे करीत असलेले नुकसान पद व अधिकाराचा गैरवापर करून वाळु व गौणखनिज पट्ट्यांवरील खाजगी बाउन्सरची नियुक्ती व त्यामार्फत होत असलेला अपहार व अपहाराला दिले जाणारे संरक्षण इत्यादींचा आपल्या कार्यालयीन स्तरावरुन उच्चस्तरीय चौकशी करुन कायदेशीर कारवाई करावी व शासनाचे होत असलेले नुकसान, शासकीय मालमत्ता व निधीचा अपहार व गैरवापर यास आळा घालावा, दोषीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे निवेदनात नमुद केले आहे.



# शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या : गोदावरी कोकाटे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यात सलग काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्याचे आतोनात नुकसान झाले आहे. तालुक्यातील सुरवातीला पडलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांना दोन तिन वेळा पेरणी करव्या लागल्या ससत वाढत असलेल्या महागाईमुळे खते बियाणे किंमतीत भक्कम वाढ झाली आहे यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे.

तालुक्यातील पांग्रा डोळे जिल्हा परिषद सर्कल मधील टिट्वी, पांग्रा डोळे, नांद्रा, गोत्रा, रायगाव, सावरगाव मुंडे, देवलगाव वायसा, शिवनी जाट, येवती, वझर आघाव, चिंचोली सांगडे, पार्डा दराडे येथे पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्याच्या शेतात पाणी साचले आहे. काही ठिकाणी पुराने शेती वाहून गेली आहे. शेतकऱ्याचे सोयाबीन, तुर, मुग, उडीद पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून हेक्टरी ५० हजार रूपयाची मदत देण्यात यावी, अशी मागणी जिल्हा परिषद माजी सदस्या गोदावरी भगवान कोकाटे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.प्रतापराव जाधव व आमदार डॉ.संजय रायमूलकर यांच्याकडे निवेदनाव्दारे केली.

# निफाड येथील जवान रंगनाथ पवार बाडमेर येथे शहीद

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** महाजनपूर ता.निफाड जि.नाशिक येथील सीमा सुरक्षा दलाचे जवान रंगनाथ वामनराव पवार यांचे बाडमेर (राजस्थान) येथे कर्तव्य बजावत असताना शहिद झाले. त्यांच्या निधनाची बातमी निफाड तालुक्यात कळताच तालुक्यावर शोककळा पसरली आहे. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांनी देशसेवेसाठी जाण्याचे ठरवले. सन १९९८ साली त्यांची भोपाळ (मध्यप्रदेश) येथील भरतीत त्यांना संधी मिळाली. त्यांनी हजारीबाग झारखंड येथे सहा महिन्यांचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांची सीमा सुरक्षा दलात नियुक्ती झाली.

तेथे कर्तव्य बजावत असताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले.



त्यांच्या निधनाचे कारण अद्याप कळले नाही. त्यांचा सेवेचा कालावधी संपत आला होता. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. मयत रंगनाथ यांचे पार्थिव विमानाने मुंबईला आणण्यात आले असून आज संध्याकाळपर्यंत त्यांच्या गावी येईल, असे सांगण्यात आले. सायखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पी.वाय. काद्री यांनी महाजनपुर येथे भेट दिली आहे.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी

आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला



३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत

पुस्तकांवर 20% सूट






गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-




पाने ५३४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568




पाने ३६४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# शिंदखेडा येथे हल्ला करणाऱ्या मुख्य आरोपीच्या तलवारीसह मुसक्या आवळल्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हॉटेल चालक जयवंतराव दौलतराव पाटील यांच्यावर प्राणघातक हल्ला करणारे अनिल भिल व इतर दोन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा घडल्यापासून सदर आरोपी हे फरार होते, आरोपींना तात्काळ अटक करण्यासाठी पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांना सुचना दिल्या होत्या. आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने एक पथक नेमण्यात आले होते. आरोपींचा शोध सुरु असताना बातमीदाराकडुन खबर मिळाली की, शिंदखेडा पोस्टे अनिल जगन भिल व त्याचे २ साथीदार हे अजनाळ ता.जि. धुळे परिसरात वावरत आहेत. अशा माहिती वरून पथक रवाना करण्यात आले होते. खात्री झाल्यानंतर त्यांना पकडण्याकामी सापळा लावला असता पोलीस असल्याचे पाहून सावध होत आरोपींनी पळ काढला. पथकाने त्यांचा जवळपास ५ ते ७ कि.मी पाठलाग करून त्यापैकी एक आरोपीस पकडुन स्थानिक गुन्हे शाखा कार्यालय येथे आणून सदर आरोपीने त्याचे नाव अनिल जगन भिल असे सांगितले. त्याचेकडे दाखल गुन्हे चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा त्याचे दोन साथीदारांच्या मदतीने केल्याची कबुली दिल्ली. सदर आरोपीस विश्वासात घेवून अधिक विचारपुस करीत असताना त्याचेकडे एक मोठी तलवार असल्याची कबुली दिली. तलवार ताब्यात घेवून खात्री केली असता आरोपी शिंदखेडा परिसरात दहशद माजवण्याच्या उद्देशाने तलवार जवळ बाळगून लोकांच्या मनात भिती निर्माण करीत असल्याने सदर घेतलेल्या आरोपीविरुद्ध तलवार बाळगल्याबाबत गुन्हा दाखल केला. तसेच त्याचे इतर दोन साथीदारांचा शोध घेणे सुरु आहे. सदर कारवाई ही प्रविणकुमार पाटील, प्रशांत बच्छाव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कुमार पाटील, सपोनि प्रकाश विक्रम पाटील, अशोक पाटील, संजय पाटील, कुणाल पानपाटील, उमेश पवार, रविकरण गोड, विशाल पाटील, गुलाब पाटील, महाजन अशांनी केली आहे.

# सावळदबारा-देव्हारी रस्ता वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरतो

## रस्त्याला आले तळ्याचे स्वरूप; श्रीक्षेत्र चक्रधर मंदिर येथे जाणाऱ्या भाविकांना करावी लागतेय पाण्यातून कसरत

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा, देव्हारी, पिंपळवाडी ते डोंगराच्या पायथ्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर सध्या मोठ मोठे खड्डे पडल्याने परिसरातील वाहनधारकांना, रुग्णांना, भाविक भक्त, कर्मचारी व विद्यार्थी यांना या रस्त्यावर मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यात खड्डे की खड्डयात रस्ता हे एक न उलगडणारे कोडे पडले आहे. या खड्डयांमुळे दिवसेंदिवस अपघातात वाढ होत असून फर्दापूर संबंधीत प्रशासन मात्र जाणूनबुजून झोपेचे सोंग घेऊन  दुर्लक्ष करत असल्याने देव्हारी येथील गावकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे, खड्डेच आहेतच पण सावळदबारा येथील विटभट्टीजवळ भररस्त्यावर रस्त्याला तळाचे स्वरूप आले. साधारण दोन फुटांपर्यंत येथे पाणी या रस्त्यावर आहे. सावळदबारा ते देव्हारी, पिंपळवाडी या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. यामुळे नेहमी लहान मोठे अपघात घडत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर अनेकजण जखमी झालेले आहेत. सावळदबारापासून हाकेच्या अंतरावर तळाचे स्वरूप रस्त्याला आले आहे आणि या तुंबलेल्या पाण्यामुळे शेजारच्या शेतकऱ्यांना सुद्धा या पाण्याचा नाहक त्रास सोसावा लागत आहे. हे जर पाणी शेतात गेले तर पिंकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. या १० कि.मी. रस्त्याच्या अंतराचे अनेक वर्षापूर्वी डांबरीकरण व मजबुतीकरण झालेले होते. त्यानंतर रस्त्याची डागडुजी झालेली नसल्यामुळे त्याचे तीन तेरा वाजले आहे. एक एक फुटांपर्यंत खड्डे पडले आहे. हा रस्ता श्री क्षेत्र चक्रधर मंदिर मार्गे नेहमी जात असल्याने भाविकांची नेहमी वर्दळ राहते. पुढील महिन्यात श्रावण महिना सुरु होत असल्यामुळे दररोज श्री चक्रधर स्वामी यांच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, जिल्हाभरातून भाविकांची मोठी गर्दी होत असते. दरवर्षी भाविकांना या खड्डेमय व जलमय रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय शेतकऱ्यांना आपला शेतमाल बुलढाणा येथील मार्केटमध्ये नेताना कसरत करावी लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांसह परिसरातील ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधीत विभागाने श्रावण मास लागण्याअगोदर किमान मजबुतीकरण व डांबरीकरण करुन रस्त्याची डागडूजी करावी अशी मागणी परिसरातील शेतकरी व वाहनधारकांमधून होत आहे.

**रस्त्यात खड्डे पडल्यामुळे त्यात पावसाचे पाणी साचते. यामुळे वाहनधारकांना खड्डयांचा अंदाज येत नाही. यात अनेक नागरिक जखमी झाले आहे. लवकरात लवकर तो दुरुस्त करावा अन्यथा रस्ता रोको करण्यात येईल अशा इशारा देखील देव्हारी येथील ग्रामस्थ यांनी दिला आहे.**

**उत्तम चव्हाण, उपसरपंच देव्हारी ता सोयगाव**

**दररोज महाराष्ट्रातून व जिल्हाभरातील भाविकांची श्री चक्रधर स्वामी मंदिर येथे गर्दी होते आणि शाळा, कॉलेज विद्यार्थी यांना यामुळे त्यांना ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. या विटभट्टीजवळ तळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पाण्यामुळे खड्डाचा अंदाज येत नाही म्हणून छोटीमोठी वाहने खाली पडत आहे. संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांनी त्वरित लक्ष घालावे ग्रामस्थांना व वाहनधारकांना होणार त्रास दूर करावा असे निवेदन सुद्धा संबंधीत विभागात देण्यात आले आहे.**

**सरपंचपती भाऊराव लक्ष्मण कोलते**
**सावळदबारा ता.सोयगाव**



# भीजपावसामुळे शेतीची कामे खोळंबली

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश वाघमारे**

**वडवणी :** गेल्या आठ ते दहा दिवसांपासून संततधार पाऊस तालुक्यात सर्वत्र पडत आहे. परिणामी जोमात असणार्या पिकांची मशागत करण्याचे कामे खोळंबली आहेत.

तालुक्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून संततधार पाऊस पडत आहे.

त्यामुळे शेतीसमभागात पाणी साचुन राहिले आहे. त्यामुळे कापूस, सोयाबीन, तुर, मूग, उडीद, बाजरी वगैरे पिकांच्या खुरपणी कोळपणीचे कामे खोळंबलेली पहायला मिळत आहेत.

### गुरे-शेळ्या चारण्यास नेता येत नाहीत

गेल्या आठ-दहा दिवसापासून पडणार्या संततधार पावसामुळे दुध दुभत्या गुरांना व शेळ्या- मेंढ्यांना चारण्यास नेता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

### तालुक्यातील छोटे नदी-नाल्या ओसंडून वाहू लागले

संततधार पडणाऱ्या पावसामुळे शेती कामे तर खोळंबलीच आहेत. पण सर्व छोट्या नदी नाल्या मात्र ओसंडून वाहू लागल्या आहेत. तर छोटे तलाव भरतीच्या वाटेवर आहेत.

# आमदार व महसूल प्रशासनांकडून पाझर तलावाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**हिमायतनगर :** तालुक्यातील दुधड-वाळकेवाडी येथे विद्यमान आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी संबंधित सर्व महसूल प्रशासन घेऊन तलावाची पाहणी करायला आले. हिमायतनगर तालुक्यात गेल्या आठ दिवसापासून सलग पाऊस पडत असल्यामुळे सर्व नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या इवल्याशा पिकात खुप सारे पाणी साचून मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांना मिळून देण्यासाठी व तसेच दूधड -वाळकेवाडीला असलेल्या पाझर तलावाची अवस्था पाहण्यासाठी थेट प्रशासन घेऊन आमदार माधवराव पाटील जवळगावकर हे आले होते.



हिमायतनगर तालुक्यातील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या दुधड -वाळकेवाडी येथे नागरिकांची पाण्याची सोय व्हावी ही, महत्वकांक्षा ठेऊन प्रशासनाने याठिकाणी पाझर तलावाची १९७१ मध्ये निर्मिती केली. दुधड -वाळकेवाडी येथील पाझर तलावाचे काम इ.स. १९७२-७३ ला काम पूर्ण झाले. सध्याच्या काळात अद्यापही दुरुस्ती झालेली पाहायला मिळालेली नसल्याने प्रशासनाच्या निदर्शनास यावे म्हणून मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी उचललेले पाऊल हे खूप महत्वाचे आहे. पाझर तलावाची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे कारण चुकूनही तलाव लिकीज झाला तर मोठया प्रमाणात जीवीतहानी होण्यास कोणीही टाळू शकत नाही. तालुक्यात सर्वात मोठे तलाव हे दूधड -वाळकेवाडीचे म्हणून ओळखले जाते. या तलावाचे काम पूर्ण होऊन जवळपास पन्नास ते साठ वर्ष झाले. तरी पण या तलावाची दुरुस्ती झालेली नाही. म्हणून हदगाव- हिमायतनगर मतदारसंघाचे आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी हिमायतनगराचे तहसीलदार व संबंधित सर्व प्रशासन यांना घेऊन पाहणी केली. यावेळी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कर्पेच्या गळयात पुन्हा एकदा महापौरपदाची माळ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पुन्हा येण्याचा शब्द न देताही पुन्हा येईलच असा मनातून असलेला विश्वास कर्पेच्या कामी आला. ते पुन्हा आले. ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून अवघ्या सात महिन्यातच महापौरपदाचा राजीनामा द्यावा लागलेल्या प्रदीप कर्पेना पक्षाने नाराज केले नाही. त्यांनी त्यांना महापौरपदासाठी पुन्हा एकदा संधी दिली आहे. आज प्रदीप कर्पेनी महापौरपदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी धुळे लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे खासदार माजीमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आ. राजवर्धन कदमबांडे, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल, भाजपा नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते. दुपारी २ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती. या मुदतीत प्रदीप कर्पे यांच्याशिवाय दुसरा कुणीही उमेदवारी अर्ज दाखल केला



नाही. त्यामुळे कर्पेच्या गळयात पुन्हा एकदा महापौरपदाची माळ पडली. औपचारीक घोषणा केवळ आता बाकी राहिली आहे. कर्पे बिनविरोध महापौर झाल्याने फटाक्यांची आतिषबाजी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी केली. तसेच पेढे भरवून तोंड गोड केले. ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून धुळ्याचे महापौरपदाचा प्रश्न थेट सर्वोच्च न्यायालयात मांडला गेला. न्यायालयाच्या आदेशामुळे प्रदीप कर्पेना अवघ्या सात महिन्यातच महापौरपदाचा राजीनामा द्यावा लागला. महापौरपदासाठी नव्याने प्रक्रिया राबविण्याच्या सुचना केल्या गेल्या. महापौर आरक्षण हे खुल्या प्रवर्गासाठी जाहिर झाल्याने भाजपामध्ये अनेक इच्छुकांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या. पडद्याआडही खलबत्ते झाली.

**पक्षाच्या धोरणानुसारच कर्पेना उमेदवारी : भामरे**

मागच्या सरकारने ओबीसी आरक्षणाचा प्रश्न व्यवस्थीत हाताळल्याने प्रदीप कर्पेना महापौरपदावरुन राजीनामा द्यावा लागला होता. ज्या-ज्या ठिकाणी ओबीसी उमेदवारांवर अशाप्रकारे अन्याय झाला असेल त्यांना पद सोडावे लागले असेल, अशांना पुन्हा संधी देण्याचे पक्षाचे धोरण आहे. त्या धोरणाला अनुसरुनच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, आ. गिरीश महाजन, आ. जयकुमार रावल यांनी कर्पेच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याची माहिती खा. सुभाष भामरे यांनी दिली.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## वयात येताना...

आधुनिक केसरी

मुलगा किंवा मुलगी जन्माला आली की आनंद होतो. आपण बर्फी, पेढे, जिलेबी वाटतो. हळू -हळू ते गोंडस बाळ आई, बाबा, दादा, मामा म्हणायला शिकतं, बघता बघता ते बाळ नर्सरीमधून शाळेत आणि शाळेतून महाविद्यालयात कधी जाऊ लागतं समजतही नाही. आपण सर्व जण या अनुभवातून गेलेलो आहोत आपल्या सर्वांनाच याचे अनुभव आलेले आहेत.

वयात आल्यानंतर शरीरात होणारे बदल, कामभावना अशा अनेक गोष्टीची सुरुवात नैसर्गिकरीत्या शरीरात व्हायला लागते. या बदलामुळे अनेक वेळा मुल गोंधळून जातात. आपल्यालासुद्धा हे बदल कळत असतात पण ते मुला-मुलींना सांगायचे कसे? आलेले अनुभव, माहिती मुलांमुलींपर्यंत पोहोचवायची कशी या विचारानं आपली तारांबळ उडते.

हे जीवन आहे बालपण, यौवन, प्रौढत्व जीवनातले तीन महत्त्वाचे टप्पे आणि ते कोणलाही चुकले नाहीत, अगदी मानवरूप धारण करुन आलेल्या देवांनाही, त्यामुळे वयात आल्यानंतर होणारे जे प्रमुख असे शारीरिक, मानसिक व सामाजिक बदल आहेत त्याबद्दल आपण जाणून घेऊया.

आपण म्हणतो आपल्या मुलाला किंवा मुलीला, बाबांची किंवा आईची चप्पल यायला लागली की समजायचं मुले मोठी झाली. पण मित्रांनो, हो. एवढ्यावर थांबत नाही तर वयात आल्यानंतर जी चलबिचल सुरू होते त्याबद्दल पूर्ण माहिती असणे आवश्यक असते. वयात येणे आणि शिक्षणाची महत्त्वाची वर्षे म्हणजेच इयत्ता ८ वी ते १२ वी हा काळ एकदमच सुरू होतो. याच काळात मन लावून अभ्यास करणं, आपल्या ध्येयपूर्तीच्या दिशेने मार्गक्रमण करणं आणि यांसाठी एकाग्रता, मेहनत, अभ्यास या गोष्टी कराव्या लागतात. एकीकडे ही गोष्ट असते तर त्यावेळी दुसरीकडे शरीरात आमूलाग्र बदल घडत असतात.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समाधान कॉलनी, अदालत रोड, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, 9850822648

# शांताबाई किशनराव बारबिंड यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्रेय नगर येथील रहिवासी शांताबाई किशनराव बारबिंड यांचे आज 15 जुलै रोजी वृध्दापकाळाने पहाटे 4:30 वाजता निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 89 वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर प्रतापनगर स्मशानभूमीत दुपारी 4 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा परिवार आहे. श्रेय नगर औरंगाबाद येथील रहिवासी कालिदास किशनराव बारबिंड यांच्या त्या मातोश्री होत.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in